


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९२ ■ शनिवार, दि. २ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## बारावीचा निकाल जाहीर; राज्याचा निकाल 89.79 टक्के

# यंदाही मुलींनीच मारली बाजी !

प्रतिनिधी २मे

**पुणे:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आज इयत्ता १२ वीचा निकाल जाहीर केला असून राज्याचा एकूण निकाल ८९.७९ टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनीच वर्चस्व राखले असून, मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.१५ टक्के आहे, तर मुलांची टक्केवारी ८६.८० टक्के इतकी आहे. विभागीय निकालात कोकण विभाग (९४.१४ टक्के) प्रथम क्रमांकावर, तर लातूर विभाग (८४.१४ टक्के) सर्वात शेवटी आहे. विज्ञान शाखेने ९६.४४ टक्केनिकालासह आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. यंदा निकाल लवकर लावण्यासाठी परीक्षा १० दिवस आधी घेण्यात आली होती. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांनी अभिनंदन केले असून, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### अकोला जिल्ह्याचा वाणिज्य शाखेत दबदबा

अकोला जिल्ह्याने शैक्षणिक सातत्य राखत वाणिज्य आणि विज्ञान शाखेत चांगली मजल मारली आहे. अकोल्याचा वाणिज्य शाखेचा निकाल ९१.५१ टक्के लागला असून हा विभागात सर्वाधिक आहे. विज्ञान शाखेत अकोल्याचा निकाल ९६.९५ टक्के लागला असून एकूण १४,३०१ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. कला शाखेचा निकाल ७८.४५ टक्के नोंदवण्यात आला आहे.

### अमरावती विभाग १२ वी निकाल: जिल्ह्यानुसार कामगिरीचा आढावा

अमरावती: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अमरावती विभागीय मंडळाचा निकाल ९०.९२% लागला आहे. विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये चुरस पाहायला मिळाली असून जिल्ह्यानुसार सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

### अमरावती जिल्ह्याची संतुलित कामगिरी

विभागाच्या मुख्य केंद्राने सर्व शाखांमध्ये सरासरीपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९६.६९ टक्के लागला असून १६,०४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ७८.९९ टक्के इतका आहे.

### बुलढाणा जिल्हा निकालात अव्वल

बुलढाणा जिल्ह्याने विभागातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अत्यंत सरस कामगिरी केली आहे. विज्ञान शाखेत जिल्ह्याने ९८.७५ टक्के निकालासह विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. कला शाखेतही बुलढाणा ८८.३१ टक्के निकालासह आघाडीवर आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ९२.९९ टक्के इतका लागला आहे.

### वाशिम जिल्ह्यात मुलींची कौतुकास्पद कामगिरी

वाशिम जिल्ह्याने कमी विद्यार्थी संख्या असूनही गुणवत्तेत चांगली झेप घेतली आहे. वाशिमचा विज्ञान शाखेचा निकाल ९६.७८ टक्के लागला आहे. कला शाखा: कला शाखेत ७९.९४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेचा निकाल ८३.८४ टक्के नोंदवण्यात आला आहे.

### १२ वी निकालात मुलींची सरशी, विज्ञान शाखे सर्वाधिक पास

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अमरावती विभागीय मंडळाने आज फेब्रुवारी-मार्च २०२६ चा इयत्ता १२ वीचा निकाल जाहीर केला असून, विभागाचा एकूण निकाल ९०.९२ टक्के लागला आहे. या निकालात दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. विभागातून एकूण ६८,८४४ मुली परीक्षेस प्रविष्ट झाल्या होत्या, त्यापैकी ६४,६८१ मुली उत्तीर्ण झाल्या असून त्यांची टक्केवारी ९३.९५ टक्के इतकी आहे, तर मुलांचा निकाल ८८.२९ टक्के लागला आहे. शाखानिहाय निकालाचा विचार करता, विज्ञान शाखेने ९७.४८ टक्के निकालासह आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्याने ९८.७५ टक्के निकालासह विभागात अव्वल स्थान पटकावले असून, यवतमाळ (९७.६५ टक्के) आणि अकोला (९६.९५ टक्के) जिल्ह्यांनीही चांगली कामगिरी केली आहे. कला शाखेचा निकाल ८१.३३ टक्के लागला असून, बुलढाणा जिल्हा (८८.३१ टक्के) आघाडीवर आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ८९.८७ टक्के लागला असून अकोला जिल्ह्याने ९१.५१ टक्क्यांसह विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. व्यवसाय अभ्यासक्रम (hSCed-VOCed) शाखेत ७५.८७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे, तंत्र-विज्ञान (Teched-Scied) शाखेत प्रविष्ट झालेल्या सर्व ३६ मुली उत्तीर्ण झाल्या असून या शाखेतील मुलींच्या निकालाची टक्केवारी १०० टक्के आहे. संपूर्ण विभागात एकूण १,४७,७५४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी १,३४,३५२ विद्यार्थ्यांनी यशाची चव चाखली आहे.


### यवतमाळ जिल्हा तंत्र-शिक्षणात आघाडी

यवतमाळ जिल्ह्याने तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणात आपली चमक दाखवली आहे. यवतमाळचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.६५ टक्के लागला आहे. व्होकेशनल या शाखेत जिल्ह्याचा निकाल ८३.३६ टक्के असून मुलींच्या यशाचे प्रमाण ९३.७९ टक्के इतके उच्च आहे. कला शाखेचा निकाल ८०.७३ टक्के इतका आहे.

## देशभरात कोट्यवधी मोबाईलवर एकाच वेळी आला अलर्ट मेसेज

वृत्तसंस्था २मे

**नवी दिल्ली:** देशभरात शनिवारी सकाळी ११:४५ वाजता अनेक मोबाईल फोनवर एकाच वेळी सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला. स्क्रीनवर हिंदी-इंग्रजीमध्ये एक संदेश होता. सायरन बंद झाल्यावर मोबाईलवर संदेश वाचूनही दाखवण्यात आला. यामुळे अनेक लोक अस्वस्थ झाले, तर अनेकजण गोंधळले. मात्र, सरकारने घाबरण्याची गरज नसल्याचे सांगितले.




हा संदेश राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरण, म्हणजेच NDMA ने पाठवला होता, जो आपत्कालीन मोबाईल अलर्ट चाचणीचा भाग आहे. NDMA ने आपत्कालीन परिस्थितीत लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी २ मे रोजी या सेल ब्रॉडकास्ट अलर्ट प्रणालीची चाचणी केली.

NDMA ने मोबाईल एडए ला सेल ब्रॉडकास्ट (CB) तंत्रज्ञानाशी जोडले आहे. यामुळे निवडलेल्या परिसरात सक्रिय असलेल्या सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी अलर्ट मिळेल. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रिअल टाइम माहिती पोहोचवता येईल. शनिवारी देशातील सर्व राज्यांच्या राजधान्यांमध्ये आणि दिल्ली-NCR मध्ये सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी चाचणी संदेश पाठवण्यात आला. हा संदेश हिंदी आणि इंग्रजीसोबत सर्व प्रादेशिक भाषांमध्येही पाठवण्यात आला. या संदेशात लोकांना सांगण्यात आले की ही केवळ चाचणी आहे आणि यावर कोणतीही कारवाई करण्याची गरज नाही.

सरकारने दोन दिवसांपूर्वीच मेसेज पाठवून लोकांना आवाहन केले होते की, टेस्टिंगचा मेसेज मिळाल्यास घाबरू नका. शनिवारचा मेसेज केवळ आपत्कालीन परिस्थितीत इशारा देणाऱ्या प्रणालीची तपासणी करण्यासाठी पाठवण्यात आला होता. आपत्कालीन परिस्थितीत लोकांना रिअल टाइम अलर्ट देण्यासाठी सरकारी संस्था सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलीमॅटिक्स (Ced-DOT) ने 'SAChET' ही एकात्मिक अलर्ट प्रणाली विकसित केली आहे. सचेत नावाचे हे सिस्टम कॉमन अलर्टिंग प्रोटोकॉल (CAPed) वर आधारित आहे. हे देशातील सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सक्रिय करण्यात आले

## विधानसभा निकालांपूर्वी ममता बॅनर्जींना सुप्रीम कोर्टाचा धक्का

वृत्तसंस्था २मे

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी केंद्र सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील कर्मचाऱ्यांची मतमोजणी पर्यवेक्षक) म्हणून नियुक्ती करण्याच्या निर्णयाला तृणमूल काँग्रेसने (TMC) सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, आज (दि. २ मे) सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. निवडणूक आयोगाच्या १३ एप्रिलच्या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## आरटीई प्रवेशासाठी ४० हजारांची लाच घेताना

# एजंटास रंगेहात पकडले

प्रतिनिधी २मे

**पिंपरी :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) मुलीचा प्रवेश निश्चित करण्यासाठी गेलेल्या पालकाकडे ४० हजारांची लाच मागणाऱ्या एजंटाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. आकुर्डी येथील फकीरभाई पानसरे उर्दू प्राथमिक शाळेत गुरुवारी (दि. ३० एप्रिल) ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्ञानेश्वर ऊर्फ माउली गंगाराम जगताप (वय ३७, रा. चिंचवडेनगर, चिंचवड) असे रंगेहात पकडलेल्या संशयिताचे नाव आहे. याप्रकरणी ३० वर्षीय व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सतीश वाळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील ३० वर्षीय तक्रारदाराने मुलीच्या आरटीई प्रवेशासाठी १६ मार्च रोजी ऑनलाइन अर्ज भरला होता. २७ एप्रिल रोजी ते अर्जाच्या पडताळणीसाठी आकुर्डी येथील पडताळणी केंद्रावर गेले होते. तिथे त्यांचा अर्ज बाद झाल्याचे त्यांना सांगण्यात आले. यावेळी त्यांची भेट संशयित माउली जगताप याच्याशी झाली. त्याने तक्रारदाराच्या मुलीच्या अर्जाची पडताळणी करून प्रवेशाची पावती मिळवून देण्यासाठी ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.

## गॅस दरवाढीचा फटका केरळमध्ये ६ मे रोजी हॉटेल्स बंद!

**केरळ:** देशभरात व्यावसायिक गॅसच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीनंतर केरळमध्ये हॉटेल व्यवसायिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ६ मे रोजी संपूर्ण राज्यातील हॉटेल्स आणि उपाहारगृहे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे दैनंदिन जीवनावरही काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अलीकडेच व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीमुळे हॉटेल आणि उपाहारगृह चालवणाऱ्यांवर मोठा आर्थिक ताण आला आहे. वाढीनंतर १९ किलो वजनाच्या सिलेंडरचे दर तिरुवनंतपुरम, कोची आणि कोझिकोडसारख्या शहरांमध्ये लक्षणीयरीत्या वाढले आहेत.

## पंतप्रधानांविषयी आक्षेपार्ह पोस्ट; उमरखेड पोलिसांत तक्रार

प्रतिनिधी २मे

**यवतमाळ :** सोशल मीडियावर पंतप्रधानांविषयी आक्षेपार्ह व बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याच्या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. भाजपाचे यवतमाळ जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 'यवतमाळ ग्रुप' या फेसबुक समूहात दिपक जिठ्ठे नावाच्या व्यक्तीकडून संबंधित पोस्ट प्रसारित करण्यात आली. या समूहात सुमारे ९५०० सदस्य असून, सदर मजकूर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, पोस्टमध्ये पंतप्रधानांविषयी गंभीर व असभ्य आरोप करण्यात आले असून, ती जाणीवपूर्वक व द्वेषातून पसरवण्यात आली आहे. त्यामुळे समाजात गैरसमज व तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच पोस्टचा स्त्रोत, मोबाईल क्रमांक, आयपी ॲड्रेस आदी डिजिटल पुरावे तपासावेत, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. या प्रकरणी

उमरखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.




## सॉफ्टवेअरमध्ये फेरफार करून 65 लाखांची अफरातफर

### दिग्रसमध्ये रुग्णालयातील गैरप्रकार उघड

प्रतिनिधी २मे

**यवतमाळ :** दिग्रस येथील आरोग्यधाम रुग्णालयात सॉफ्टवेअरमध्ये फेरफार करून तब्बल ६५ लाख ७४ हजार रुपयांची अफरातफर केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी दोघांसह अन्य संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. संदिप रामराव दुधे (वय ५३), व्यवस्थापकीय संचालक, आरोग्यधाम हेल्थ केअर प्रा. लि. यांच्या तक्रारीवरून दिग्रस पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

पोलिसांच्या माहितीनुसार, जानेवारी २०२२ ते जून २०२५ या कालावधीत आरोपी सुजल राजू नरपासे (वय २२, रा. गांधीनगर) व उमेश विष्णुदास राठोड (वय ३५, रा. वाईगौळ, ता. मानोरा) यांनी संगनमताने हा प्रकार केला. रुग्णालयाच्या सॉफ्टवेअरमध्ये स्वतःचे तसेच इतरांचे आयडी वापरण्याबरोबरच प्रशासनाचा आयडी व पासवर्ड गैरमार्गाने मिळवून त्याचा वापर करण्यात आल्याचे समोर आले आहे.

रुग्णांकडून तपासणीसाठी रक्कम स्वीकारल्यानंतर पावत्या तयार केल्या जात; मात्र रुग्ण पावती घेऊन गेल्यानंतर ती पावती तत्काळ रद्द करून संबंधित रक्कम स्वतःकडे वळविण्यात येत होती. तसेच नोंदी लपवण्यासाठी पावत्या मागील तारखांना ढकलून सॉफ्टवेअरमध्ये फेरफार करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकारातून एकूण ६५,७४,०४९ रुपयांची अफरातफर झाल्याचा आरोप असून, भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शनिवार, दि. २ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# मानसिक आरोग्य जागरूकता महिना

मानसिक आरोग्य समुपदेशनासाठी भारतात खालील टोल-फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. या सेवा २४*७ (२४ तास) आणि मोफत आहेत: १४४१६ : ही भारत सरकारची मुख्य टेली-मानसिक आरोग्य हेल्पलाइन आहे. येथे तुम्हाला तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि समुपदेशन मिळते. १०४ : महाराष्ट्रात मानसिक आरोग्य समुपदेशनासाठी १०४ या क्रमांकावर कॉल करून तुम्ही मदत मिळवू शकता.

सध्याच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात शारीरिक आरोग्याइतकेच, किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाचे आहे ते म्हणजे 'मानसिक आरोग्य' (Mental health). मे महिना हा जागतिक स्तरावर 'मानसिक आरोग्य जागरूकता महिना' (Mentaled health Awarenes Month) म्हणून पाळला जातो. या महिन्याचा मुख्य उद्देश मानसिक आजारांबद्दलची अनास्था, भीती आणि गैरसमज दूर करणे हा आहे.


'मानसिक आरोग्य का महत्त्वाचे आहे? मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नव्हे, तर भावनिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या सुस्थितीत असणे होय.

**सर्वांगीण आरोग्य:** शारीरिक आणि मानसिक आरोग्य एकमेकांशी जोडलेले आहेत. तणावाचा थेट परिणाम शरीरावर होऊन हृदयविकार, मधुमेह यांसारखे आजार वाढू शकतात.

**कामगिरी:** मानसिक स्वास्थ्य चांगले असेल तरच आपण कामात लक्ष केंद्रित करू शकतो आणि निर्णय घेऊ शकतो.

**सामाजिक संबंध:** सुदृढ मन नातेसंबंध आनंदी आणि स्थिर ठेवण्यास मदत करते.

जागरूकतेची गरजभारतात आणि जगात नैराश्य , चिंता आणि ताणतणावाचे प्रमाण वाढत आहे, विशेषतः तरुणांमध्ये. दुर्दैवाने, मानसिक आजारांबाबत आजही समाजात 'कलंक' मानला जातो, ज्यामुळे अनेक लोक मदत मागायला घाबरतात. ठलोक काय




म्हणतील या विचारापोटी अनेक जण उपचार टाळतात, जे चुकीचे आहे.

**मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी उपाय :**

**१. संवाद साधा:** मनातील भावना जवळच्या मित्र-मैत्रिणींशी किंवा कुटुंबाशी शेअर करा.

**२. व्यायाम आणि आहार:** दररोज ३० मिनिटे चालणे, योगासने किंवा ध्यान केल्याने मन शांत राहते. पौष्टिक आहार घ्या.

**३. डिजिटल डिटॉक्स:** सोशल मीडियाचा अतिवापर टाळा. दिवसातील काही वेळ स्क्रीनपासून दूर राहा.

**४. छंद जोपासा:** स्वतःसाठी वेळ काढा आणि आवडीचे काम करा.

**५. मदत मागण्यास संकोचू नका:** जर नैराश्य किंवा अस्वस्थता जाणवत असेल, तर मानसोपचारतज्ज्ञा सल्ला घ्यावा

मानसिक आरोग्य समुपदेशनासाठी भारतात खालील टोल-फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. या सेवा २४*७ (२४ तास) आणि मोफत आहेत: १४४१६ : ही भारत सरकारची मुख्य टेली-मानसिक आरोग्य हेल्पलाइन आहे. येथे तुम्हाला तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि समुपदेशन मिळते. १०४ : महाराष्ट्रात मानसिक आरोग्य समुपदेशनासाठी १०४ या क्रमांकावर कॉल करून तुम्ही मदत मिळवू शकता. तसेच सर्व शासकीय आरोग्य संस्थेत समुपदेशन मोफत केले जाते

या सेवा कोणासाठी आहेत मानसिक ताण, नैराश्य , चिंता आत्मघाती विचार येत असल्यास. परीक्षेचा ताण, नातेसंबंधातील समस्या किंवा व्यसनमुक्तीसाठी.

विशेष यामध्ये गोपनीयता राखली जाते, त्यामुळे तुम्ही निसंकोचपणे कॉल करू शकता.

मानसिक आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. या जागरूकतेच्या महिन्यात, आपण स्वतःला आणि इतरांना समजून घेऊया. ठमन शांत, समाज सशक्तठ हे ब्रीदवाक्य जपून मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी पुढाकार घेऊया.

बाळासाहेब घुगे
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी जिल्हा परिषद अकोला

# २ मे पासून शाळांना सुट्टी तर १५ जूनला पहिली घंटा, पण हॉट विदर्भाचं काय?

शाळा १५ जूनला सुरू करून उन्हाच्या तीव्रतेपासून मुलांना बचावासाठी सुरुवातीला शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचे परिपत्रकात जाहीर केले, मग विदर्भात ऊन्हाछी तीव्रता एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच होत असते. भर उन्हात विद्यार्थी दुपारच्या सत्रामध्ये शाळेत शिक्षणासाठी व परीक्षेसाठी येत असतात. जेव्हा विदर्भात सर्वात जास्त ऊन असते तेव्हाच भर उन्हात दुपारी दोन ते तीन वाजेपर्यंत लहान मुलांच्या परीक्षा घेतल्या जातात, यादरम्यान त्यांच्या तब्येतीवर सुद्धा परिणाम होत असतो तरीसुद्धा पालक आपल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शाळेत पाठवीत असतात.



राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी सुट्टी २ मेपासून लागणार आहेत. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात १५ जूनपासूनच होणार आहे. अपवाद म्हणून विदर्भातील शाळा उशिरा सुरू करण्याची पद्धत यंदा रद्द करण्यात आली आहे. राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना २ मेपासून अधिकृतपणे उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शिक्षण संचालनालय माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय यांनी २८ मार्च रोजी काढलेल्या परिपत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. ङदरम्यान, इतर मंडळांच्या शाळांनी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.ङ त्यामुळे काही ठिकाणी शैक्षणिक उपक्रम सुरू असले, तरी विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित शाळा प्रशासनाला देण्यात आले आहेत.

परंतु दरवर्षी विदर्भातील उष्णतेची लाट बघता शाळा २६ जून पासून सुरू केल्या जातात शाळेची पहिली घंटा राजश्री शाहू महाराज यांच्या जयंती दिवशीच म्हणजेच २६ जून रोजी उघडण्यात येत असतात. विदर्भामध्ये कुणाची तीव्रता जास्त असल्यामुळे नेहमीच हा निर्णय शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येत असतो. याउलट यावर्षी उष्णतेचा पारा विदर्भात एप्रिल महिन्यातच चटके देत असून मे आणि जून मध्ये तर तापमानाचे प्रमाण जास्त असणार, असे हवामान विभागीय तज्ज्ञांनी जाहीर केले आहे. विदर्भातील तापमानाचा विचार लक्षात घेता, शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात विदर्भातील शाळांची वेळ मर्यादित ठेवण्यात आली आहे. १५ ते २७ जूनदरम्यान या शाळा सकाळी ०७ ते ११.४५ या वेळेतच भरतील. त्यानंतर ३० जूनपासून नियमित वेळापत्रक लागू होईल असेही पत्रकात जाहीर केले असले तरी, स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच तापमान वाढते असून मागील आठवड्यात तापमान ४७ष्ट डिग्री सेल्सिअस पर्यंत येऊन पोहोचले होते आणि हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढे हे तापमान ५० ते ५५ पर्यंत पोहोचणार असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शिक्षण मंडळांनी दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा मुलांच्या तब्येतीची काळजी घेत शाळा २६ जून रोजीच सुरू कराव्यात अशी मागणी पालक वर्गाकडून होत आहे.

शाळा १५ जूनला सुरू करून उन्हाच्या तीव्रतेपासून मुलांना बचावासाठी सुरुवातीला शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचे परिपत्रकात जाहीर केले, मग विदर्भात ऊन्हाछी तीव्रता एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच होत असते. भर उन्हात विद्यार्थी दुपारच्या सत्रामध्ये शाळेत शिक्षणासाठी व परीक्षेसाठी येत असतात. जेव्हा विदर्भात सर्वात जास्त ऊन असते तेव्हाच भर उन्हात दुपारी दोन ते तीन वाजेपर्यंत लहान मुलांच्या परीक्षा घेतल्या जातात, यादरम्यान त्यांच्या तब्येतीवर सुद्धा परिणाम होत असतो तरीसुद्धा पालक आपल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शाळेत पाठवीत असतात. त्यामुळे शिक्षण मंडळाने विदर्भात शाळांना सुट्टी एप्रिल महिन्यातच जाहीर करावी अशाही चर्चा पालक वर्गात सुरू आहे. लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून शिक्षण मंडळाने परिपत्रकामध्ये जाहीर केलेल्या माहितीनुसार विदर्भातील उष्णता बघता योग्य तो निर्णय घ्यावा व विद्यार्थी व पालकांना दिलासा देण्यात यावा जेणेकरून विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित राहील.

प्रा. प्रज्ञानंद श्रीकृष्ण थोरात
शिक्षक व पत्रकार
मो.: ९८२२६७४४८७

# घुसर गावात कृषी विभागाकडून डिजिटल क्रांतीचा जागर

प्रतिनिधी २ मे



**घुसर:** तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अकोलाच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार' AI' या अत्याधुनिक ॲपची व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत गावातील शेतकऱ्यांना डिजिटल शेतीचे महत्त्व पटवून देत तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली.

प्रत्यक्ष संवाद आणि तांत्रिक मार्गदर्शन तालुका कृषी अधिकारी प्रवीण भोर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाच्या पथकाने घुसर गावाला भेट दिली. यावेळी तालुक्यातील सर्व उप कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर आणि ग्रामपंचायत परिसरात प्रत्यक्ष संवाद साधला.

ॲप इन्स्टॉलेशन पथकाने स्वतः पुढाकार घेऊन शेतकऱ्यांच्या मोबाईलमध्ये 'महाविस्तार' AI' ॲप डाऊनलोड करून दिले. हवामान अंदाज आणि पीक रोगांवरील उपाय त्वरित मिळत असल्याने घुसरमधील तरुण व अनुभवी शेतकऱ्यांनी या मोहिमेचे उत्साहाने स्वागत केले.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना अधिकाऱ्यांनी या ॲपमधील खालील पाच महत्त्वाच्या बाबींवर भर दिला. पिकावरील कीड किंवा रोगाचा फोटो काढून ॲपवर अपलोड केल्यास त्वरित उपाययोजना सुचवल्या जातात.

गावाच्या अचूक लोकेशननुसार पावसाचा आणि हवामानाचा अंदाज मिळतो. महाडीबीटी, पीक विमा आणि इतर अनुदानाच्या योजनांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध. जवळच्या बाजार समित्यांमधील शेतमालाचे दर रोज अपडेट होतात. कृषी विद्यापीठातील संशोधनावर आधारित तांत्रिक माहिती सोप्या भाषेत उपलब्ध.

या मोहिमेचे सूक्ष्म नियोजन मंडळ कृषी अधिकारी युवराज बेले , विजय वानखेडे , प्रवीण देवकर यांनी केले असून, घुसर परिसरात याची यशस्वी अंमलबजावणी सहायक कृषी अधिकारी व त्यांच्या टीमने केली. या मोहिमेत अकोला तालुका कार्यालयातील सहाययक कृषी अधिकारी नी सक्रिय सहभाग नोंदवला. या करिता गावातील श्री चंदू खडसे , प्रमोद पागृत , स्थानिक लोक प्रतिनिधी नि मदत केली

ठघुसरमधील प्रत्येक शेतकऱ्याच्या हातात हे डिजिटल शस्त्र असावे, जेणेकरून शेती अधिक फायदेशीर आणि जोखीममुक्त होईल, हाच आमचा उद्देश आहे.ठ_न — तालुका कृषी विभाग, अकोला

घुसर आणि परिसरातील उर्वरित शेतकऱ्यांनी देखील गुगल प्ले स्टोअरवरून 'महाविस्तार' AI' डाऊनलोड करावे किंवा अधिक माहितीसाठी आपल्या कृषी सहाय्यकांशी संपर्क साधावा.

# होलिक्रॉस कॉन्व्हेंटमध्ये रंगला आठवणींचा मेळा

प्रतिनिधी २ मे

## ♦ २५ वर्षांनंतर 'बॅक टू स्कूल' संमेलनात मित्र रमले



**अकोला:** शाळेच्या दिवसातले ते निखळ प्रेम, शिक्षकांचा मायेचा ओरडा, मधल्या सुट्टीतली धम्माल, सायकल आणि रिक्षावाल्या काकांची वाट पाहणे... शाळेतील ते रम्य दिवस आजही मनाच्या कोपऱ्यात घर करून आहेत. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी होलिक्रॉस कॉन्व्हेंटच्या २००१ बॅचच्या विद्यार्थ्यांनी २५ वर्षांनंतर एकत्र येत, शुक्रवार २४ एप्रिल रोजी 'बॅक टू स्कूल' संमेलनाचा आनंद लुटला.

दोन दशकांपूर्वी शाळेच्या गेटमधून बाहेर पडलेले हे विद्यार्थी आज आयुष्याच्या विविध वळणांवर स्थिरावले आहेत. कोणी देशसेवेत कार्यरत आहे, तर कोणी राजकारण, समाजकारण आणि व्यवसायात आपले नाव कमावले आहे. काही मित्र अकोल्यात आहेत, तर काही परदेशात कर्तृत्वाचा झेंडा फडकवत आहेत. २४ एप्रिल रोजी हे सर्व 'जबाबदार नागरिक' पुन्हा एकदा 'खोडकर विद्यार्थी' होऊन शाळेच्या आवारात वावरताना दिसले.

जे विद्यार्थी आणि शिक्षक काही कारणास्तव प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत, त्यांच्यासाठी यू ट्यूब आणि फेसबुक वर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. तंत्रज्ञानाच्या मदतीने सातासमुद्रापार असलेल्या मित्रांनीही या सोहळ्याचा आनंद घेतला.

या सोहळ्याला राऊत सर, भाटिया सर, दुरैया टिचर, सिस्टर अंजना, मोहन विठलानी, संजय धाबलिया, किशोर भारसकर, अभिषेक देशमुख, शैलेश बांगडे, विहान परमार, रहीम हबीब डोढीया, उत्कर्ष पुराणिक, हर्षल अबुज, अजिंक्य राजपूत, गिरीश भांगे, रश्मी अडतिया, रुपल व्यास (जोशी), नावेद हक आणि अमित यादगिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संध्या शर्मा टीचर आणि सिस्टर जुली यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला.

या कार्यक्रमाला राजेंदर सिंह ओबेरॉय, मतीन खान आणि दिनेश पारेख यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी आणि शिक्षकांनी आपले अनुभव शेअर करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. माधुरी देशपांडे टीचर आणि संध्या टीचर यांनी ऑडिओ संदेश पाठवले होते, जे कार्यक्रमादरम्यान सभागृहात ऐकवण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेला देत शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. तर आपले विद्यार्थी मोठ्या हुद्द्यांवर पोहोचलेले पाहून शिक्षकांच्या डोळ्यांतही अभिमानाचे आणि आनंदाचे अश्रू तरळले. दुपारभर चाललेल्या गप्पा, हास्यविनोद आणि फोटोग्राफीमुळे हे गेट-टुगेदर सर्वांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय ठेवा ठरले आहे.

# महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटनेचे तहसीलदार यांना निवेदन

प्रतिनिधी २ मे



**अकोट:** महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या माध्यमातून मुख्यमंत्री बळीराजा पांधन रस्ते योजना मंजूर पावसाळ्यापूर्वी करण्यात यावे शेतकऱ्यांना पावसाळ्यात पायदळ जाणे तसेच वही वाट पेरी करिता ट्रॅक्टर, बैल जोडी रोड अभावी शेतात जाणे अशक्य होते त्याकरिता त्याची शासनाने तात्काळ दाखल घ्यावी व शेतकऱ्यांना न्याय द्यावा तसेच सण २०१९ पासूनचे नवीन खरेदी केलेले शेतीचे पी एम किसान योजनेचे वेतन चालू करण्यात यावे व शेतकऱ्यांसाठी रासायनिक खते रासायनिक खतांचे जे दुकानदार साठे बाजी करतात त्यांच्यावर देखील प्रशासनाने नियंत्रण ठेवावे तसेच कीटकनाशके यांच्यावरील सर्व जीएसटी कर हा तात्काळ रद्द करण्यात यावा अनुषंगाने २९ ला तहसीलदार यांना निवेदन सादर केले. यावेळी स्वप्निल बोबडे संस्थापक अध्यक्ष महात्मा फुले ब्रिगेड यांचे नेतृत्वात निवेदन देण्यात आले, सुनील काळे, नंदकिशोर गोरडे, विशाल काळे, सागर दिंडोकार, पंकज मुरेकर, सुरेंद्र काळे, हर्षल तडस, हरीश बोरोडे , अजय हाडोळे पवन नाथे, अतुल नाथे, नितीन भोपळे, विकी दिंडोकार, संजय गयदर वस्तापूर माजी सरपंच, चोहट्टा बाजार राजेंद्र ऐखे माजी सरपंच यावेळी महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व सर्व परिसरामधील शेतकरी बांधव उपस्थित होते.

# तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेसचा उद्या शुभारंभ

प्रतिनिधी २ मे

**अकोला:** विदर्भ, मराठवाडा, तेलंगणा व आंध्र प्रदेशला जोडणाऱ्या व औंढा नागनाथ, नांदेड, तिरुपती या तीर्थस्थळांना एका सूत्रात बांधणाऱ्या रेल्वे क्र. १७४२९/१७४३० तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेसचा भव्य शुभारंभ व हिरवा झेंडा दाखवण्याचा कार्यक्रम रविवार, ३ मे २०२६ रोजी सकाळी ८:०० वाजता अकोला रेल्वे स्टेशनवर होणार आहे.

खासदार अनुप भाऊ धोत्रे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या सेवेचा शुभारंभ होईल. या कार्यक्रमाला आमदार रणधीर सावरकर, महापौर शारदाताई खेडकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, विजय अग्रवाल, जयंत मसने, संतोष शिवरकर, अमोल गोगे, वसंत बाछुका, ॲड. सुभाष सिंग ठाकूर, उमेश मालू, ॲड. अमोल इंगळे, रेल्वे सल्लागार समिती सदस्य निकेश गुप्ता, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे गिरीश जोशी, माधव मानकर, राजेंद्र गिरी, शरद तुरकर, तिरुपती बालाजी भक्त मंडळाचे अध्यक्ष संदीप गावंडे, भारतीय जनता पार्टी कार्यकर्ते व रेल्वे प्रवासी संघाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

खासदार अनुप धोत्रे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वात देशभरात रेल्वे सुविधा वाढत आहेत. तिरुपती, औंढा नागनाथ, नांदेड ही तीर्थस्थळे जोडणारी ही गाडी मध्य भारताला दक्षिण व उत्तर भारताशी जोडणारा सेतू ठरेल. अकोलेकरांसाठी अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली आहे.ङ्ग

या साप्ताहिक एक्सप्रेसमुळे अकोला, वाशिम, हिंगोली, औंढा नागनाथ, परभणी, नांदेड, निजामाबाद, सिकंदराबाद मार्गे थेट तिरुपती गाठता येणार आहे. शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व भाविकांना याचा मोठा लाभ होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या व मध्य भारताला उत्तर-दक्षिणेशी जोडणाऱ्या अनेक नव्या गाड्या सुरू केल्या आहेत.

खासदार अनुप धोत्रे यांच्या सक्रिय पाठपुराव्यामुळे अकोल्याला ही ऐतिहासिक सुविधा मिळाली आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## बुद्ध पौर्णिमेनिमित्त अशोक वाटिकेत तथागत बुद्धांना अभिवादन

**अकोला:** बुद्ध पौर्णिमेनिमित्त शहरातील अशोक वाटिका येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भगवान गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले. बुद्ध पौर्णिमेनिमित्त भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांनी बुद्धांच्या शिकवणींचे स्मरण करत शांतता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. परिसरात धार्मिक आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.यावेळी विविध मान्यवरांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. बुद्ध पूर्णिमेच्या निमित्ताने समाजात एकोपा आणि शांततेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



## गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने तुकडोजी महाराज जयंती साजरी



**हिवरखेड:** येथे स्थानिक प्रभाग क्रमांक एक मधील सावता नगर येथील गुरुदेव सेवा सामुदायिक ध्यान केंद्रात राष्ट्र संत तुकडोजी महाराज जयंती साजरी करण्यात आली, ग्रामगीता प्रवचन, सामुदायिक प्रार्थना, व तुकडोजी महाराज प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तसेच उपस्थित मान्यवर गावच्या नगराध्यक्षा सुलभा दुतोंडे यांचा सत्कार करण्यात आला, यांच्यासह या प्रभागाच्या नगरसेविका वंदना वानखडे, नगरसेवक दानिश खान महेंद्र कराळे यांचा सन्मान करण्यात आला, यावेळी गुरुदेव सेवा मंडळाचे रामेश्वर नागपुरे, धनराज पिंजरकार, अजय मांनखैर, राजेश वानखडे,पवन पिजरकार, ज्ञानदेव वाघ,रमेश मानकर, वासुदेव वाघ, वासुदेव गिऱ्हे,अनिल भटकर, पवन गवई, अर्जुन खिरोडकार,अजनबाई काळपांडे, लताबाई राऊत, यांच्यासह अनेक महिला, पुरुष गुरुदेव सेवा मंडळाचे सेवक उपस्थित होते, तर दुसऱ्या दिवशी या स्थळी काळपांडे परिवाराच्या वतीने महाप्रसाद वितरीत करण्यात आल.

# महाराष्ट्र राज्याचा 67 वा स्थापना दिन उत्साहात साजरा

### पालकमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन, मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी २ मे

**अकोला:** 'विकसित भारत २०४७'च्या ध्येयाला जोडून घेत महाराष्ट्र राज्य अनेक लोककल्याणकारी योजना आणि ठोस निर्णयांच्या माध्यमातून व्यापक प्रगतीकडे दमदार पावले टाकत आहे. विकसित भारताच्या उभारणीत महाराष्ट्राचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी केले. महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ लालबहादुर शास्त्री क्रीडांगण येथे झाला. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन झाले. राष्ट्रीय गीत वंदे मातरम, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, राष्ट्रध्वज वंदन, पथसंचलन, चित्ररथ प्रदर्शन आदी कार्यक्रम झाला. अकोला जिल्ह्यातही पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांत विविध कामे वेगाने सुरू आहेत. शेतकरी, कामगार, महिला आणि युवक यांना केंद्रस्थानी ठेवून विविध योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत, असे सांगून पालकमंत्री फुंडकर यांनी विविध विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली.





## महापौर शारदा खेडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

### महापालिकेच्या आवारात झाला सोहळा

प्रतिनिधी २ मे

**अकोला:** महाराष्ट्र दिनानिमित्त महापालिकेच्या आवारात ध्वजारोहण सोहळा झाला. या वेळी महापौर, आयुक्त, महापालिकेचे काही नगरसेवक,अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

महापालिकेच्या आवारात शुक्रवारी सकाळी महापौरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपमहापौर अमोल गोगे,आयुक्त डॉ.सुनील लहाने यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र दिनाच्या महापालिकेच्या या मुख्य सोहळ्याला मोजकेच नगरसेवक उपस्थित होते. तर मोठ्या संख्येत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी महापौरांच्या हस्ते जनजागृतीपर रथाला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या महापौरांनी अकोलेकरांना शुभेच्छा दिल्या.



## गायत्री नगरमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात

प्रतिनिधी २ मे

**अकोला:** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा गौरवशाली इतिहास आणि कामगारांच्या सन्मानार्थ, अकोल्यातील माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय, गायत्री नगर येथे 'महाराष्ट्र दिन' व 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' अत्यंत उत्साहात झाला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. तिरंगा फडकल्यानंतर उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत गाऊन मातृभूमीला मानवंदना दिली. यावेळी संपूर्ण शालेय परिसर 'वंदे मातरम' आणि 'जय महाराष्ट्र'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माँ गायत्री प्राथमिक शाळेचे मुख्यध्यापक सुनील चव्हाण हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून स्व. प्रकाश देशमुख विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप वाघ उपस्थित होते. आपल्या भाषणात मुख्याध्यापकांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांच्या बलिदानाचे स्मरण करून दिले आणि विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संस्कृती, भाषा व परंपरा जतन करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये प्रामुख्याने चंद्रजित देशमुख,योगेश लंगोटे,रणजित ठाकूर यांचा समावेश होता.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दोन्ही शाळांतील शिक्षिकांनी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. व्यासपीठावर व कार्यक्रमाच्या नियोजनात: काटे मॅडम, गावंडे मॅडम, हिवराळे मॅडम, गवई मॅडम, सोळंके मॅडम, पोके मॅडम, लव्हाळे मॅडम आणि बुंदेले सर यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. तसेच, दोन्ही शाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही कार्यक्रमाच्या व्यवस्थापनात मोलाची भूमिका बजावली. प्रसन्न वातावरण, शिस्तबद्ध नियोजन आणि उपस्थितांचा उत्साह यामुळे हा महाराष्ट्र दिन गायत्री नगर परिसरातील नागरिकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.



## वडाळी देशमुखला बुद्ध जयंतीनिमित्त मिरवणुकीतून शांतीचा संदेश

प्रतिनिधी २ मे

**अकोट:** 'अप्प दिपो भव' स्वतःचा दीप बना आणि ज्ञान करून व शांतीच्या मार्गाने जीवन प्रकाशमान करा असा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने बुद्ध पौर्णिमेला आज वडाळी देशमुख येथील करुणा बौद्ध विहार मध्ये आज १ मे वैशाख पूर्णिमेला सर्वप्रथम सकाळी बौद्ध विहारांमध्ये यशोधरा महिला मंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला व तथागत भगवान बुद्धाच्या मूर्तीला हार पुष्प अर्पण करून सामूहिक वंदना पूजापाठ त्रिशरण व पंचशील ग्रहण केले सायंकाळी भगवान बुद्धाचा पाळणा गाऊन भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये भगवान बुद्धाची मूर्त सजवलेल्या रथावर विराजमान करून कॅन्डल मार्च महिलांच्या हजारोच्या जनसमुदायांमध्ये काढण्यात आला यामध्ये पंचशील ध्वजा पताका संपूर्ण महिलांच्या हातामध्ये मेणबत्ती व मंगल मैत्री म्हणत ठबुद्धम् शरणम गच्छामिठ संपूर्ण गावाला भगवान बुद्धाच्या शांतीचा संदेश देत गावाच्या प्रमुख गावप्रदक्षिणा मार्गाने महिलांची रॅली शांततेत पार पडली आज वैशाख पौर्णिमेला १ मे २०२६ ला २५७० वी जयंती नुंबुनी (नेपाळ)येथे जन्म वैशाख पौर्णिमेला बोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती व वैशाख पौर्णिमेला कुसीनारा येथे महानिर्वाण झाले. गावामधून विहार पटांगणात मिरवणूक रॅली पूर्णत्वास आल्यानंतर विहाराजवळ सर्व उपासक व उपासिका समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये खिरीचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये यशोधरा महिला मंडळ, क्रांती रत्न कला क्रीडा व बहुउद्देशीय मंडळ, समता सैनिक दल, भीमसैनिक व या मिरवणुकीला अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचा बंदोबस्त लाभला होता ,समस्त गावकऱ्यांचे सहकार्य लाभल्याबद्दल कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रकाश वाहूरवाघ यांनी केले.



## हज यात्रा २०२६ : वाढलेले भाडे आणि निकृष्ट निवास व्यवस्थेवर केंद्राकडे कारवाईची मागणी

प्रतिनिधी २ मे

**अकोला :** जावेद जकरिया (प्रदेश संघटन सचिव, राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचंद्र पवार) यांनी हज यात्रा २०२६ साठी वाढवण्यात आलेल्या हवाई भाड्याबाबत तसेच हज कमिटीमार्फत जाणाऱ्या हाजीयांच्या निवास व्यवस्थेतील त्रुटींविषयी केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे.




जकरिया यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्री श्री किरेन रिजिजू यांना पाठवलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, विमान इंधन (एव्हिएशन टर्बाइन फ्युएल) दरवाढीमुळे प्रति हज यात्रेकरू सुमारे १०,००० रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. त्यामुळे हज यात्रेकरूंवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

त्यांनी पुढे असेही सांगितले की, हज कमिटीमार्फत जाणाऱ्या हाजीयांसाठी करण्यात आलेली निवास व्यवस्था समाधानकारक नाही. विविध भागांतून सातत्याने तक्रारी येत असून निवास व्यवस्थेमध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे यात्रेकरूंना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जकरिया यांनी मागणी केली आहे की, हवाई भाड्यातील वाढ तात्काळ मागे घ्यावी किंवा सरकारने ती स्वतः वहन करावी. तसेच संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी आणि हज कमिटीच्या निवास व्यवस्थेत आवश्यक सुधारणा कराव्यात, जेणेकरून हाजीयांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. केंद्र सरकारने या गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी आणि हज यात्रेकरूंना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## निधन वार्ता

### अशोक आसलकर




**अकोट :** येथील अशोक पुंडलिकराव आसलकर(८२) यांचे २८ एप्रिलला वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### शरद जोशी



**अकोला:** अंदुरा येथील रहिवासी शरद भास्करराव जोशी, ८२, यांचे २७रोजी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, तीन भाऊ, दोन बहिणी आणि मोठा आप्त परिवार आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## भिमालपेन महोत्सव; पांढरकवड्यात ४४ व्या वर्षी सामूहिक महापूजा

प्रतिनिधी २ मे

**पांढरकवडा :** आदिवासी समाजाचे आराध्य दैवत भिमालपेन यांच्या ४४ व्या महोत्सवानिमित्त सामूहिक महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. वैशाख पूर्णिमेनिमित्त शनिवारी (दि. २ मे) सकाळी ११ वाजता हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही जय पेरसापेन देवस्थान संस्थान यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी संस्थेचे संचालक व मार्गदर्शक चंद्रकांत उईके तसेच माजी नगराध्यक्ष भाऊराव मरापे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सामूहिक महापूजा सौ. अर्चनाताई राजुभाऊ तोडसाम व सौ. मिराताई नंदूजी येडसीकर यांच्या हस्ते पार पडणार असून, संस्थेचे विश्वस्त, मार्गदर्शक मंडळ आणि भिमालपेन उत्सव समितीचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. महोत्सवानिमित्त सामूहिक महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून आदिवासी बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव मिथुन गोपाल सोयाम व विश्वस्त मंडळाने केले आहे.

# आत्मनिर्भर यवतमाळाचा संकल्प - पालकमंत्री संजय राठोड

प्रतिनिधी २ मे



**यवतमाळ :** राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा करताना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास अधिक दृढ करण्याचे आवाहन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. “विकसित भारत, विकसित महाराष्ट्र” या ध्येयपूर्तीसाठी आत्मनिर्भर यवतमाळ घडविण्याचा संकल्प करूया, असे ते म्हणाले.

समता मैदानावर आयोजित मुख्य शासकीय समारंभात त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या काही वर्षांत कृषी, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, पर्यटन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांत जिल्ह्याने प्रगती साधल्याचे सांगत राठोड यांनी पुढील काळातही विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी साडेचार कोटी रुपयांची मदत मंजूर करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच आतापर्यंत १.३० लाख शेतकऱ्यांना सुमारे १५०० कोटी रुपयांचे पीककर्ज वितरित करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन विविध उपाययोजना सुरू असून ‘जलतारा’ संकल्पनेतून भूजल पातळी वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी विविध योजनांद्वारे कोट्यवधींचा निधी वितरित करण्यात आला आहे. कर्जमाफी प्रक्रियेलाही गती देण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेतीसोबत पूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी फलोत्पादन, अन्नप्रक्रिया उद्योग आणि मनरेगा योजनांचा प्रभावी वापर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. ‘मिशन उभारी’ उपक्रमातून संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत देण्यात येत आहे.

औद्योगिक विकासासाठी विविध योजनांअंतर्गत कर्जप्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून रोजगारनिर्मितीला चालना मिळत आहे. उत्तरवाढोणा येथे बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार असून आत्मनिर्भरतेच्या दिशेने जिल्हा वाटचाल करीत आहे. जलसंधारण, रस्ते विकास, घरकुल योजना आणि डिजिटल प्रशासन यांसारख्या क्षेत्रांतही उल्लेखनीय कामगिरी झाल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करून आयुष्मान भारत योजनेतून लाखो रुग्णांना लाभ मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिक्षण क्षेत्रात डिजिटल शाळा, स्मार्ट क्लासरूमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू आहे. कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी पोलीस दलाला अत्याधुनिक वाहने आणि सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या कार्यक्रमात विविध विभागांतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वनहक्क पट्ट्यांचे वितरण आणि पोलीस दलाच्या नव्या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. दरम्यान, सुरू झालेल्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी डिजिटल स्व-गणनेत सहभागी होण्याचे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले.

## जागजईत ‘देवांच्या आंघोळी’चा अनोखा उत्सव

### वर्धा नदीच्या काठावर यात्रोत्सव

प्रतिनिधी २ मे

जावेद शेख



**राळेगाव :** यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यात वर्धा नदीच्या काठावर वसलेल्या जागजई गावात बुद्ध पौर्णिकेच्या पूर्वसंध्येला दरवर्षी पारंपरिक श्रद्धेचा अनोखा उत्सव अनुभवायला मिळतो. स्थानिक आदिवासी बांधवांच्या श्रद्धेनुसार ‘देव आंघोळीला येतात’ अशी मान्यता असून, या निमित्ताने नदीकाठावर दोन दिवसांच्या यात्रोत्सवाचे स्वरूप निर्माण होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेली ही परंपरा आजही अखंडपणे सुरू असल्याचे ग्रामस्थ सांगतात. वैशाख पौर्णिमेच्या रात्री परिसरातील देव वर्धा नदीच्या पात्रात ‘स्नानासाठी येतात’ अशी श्रद्धा असून, पहाटेपर्यंत विधिवत पूजन व धार्मिक विधी पार पडतात. पहाटे सुमारे पाच वाजता देव आंघोळ आटपून परत जातात, अशी लोकमान्यता आहे.

या यात्रोत्सवासाठी यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. त्यामुळे परिसराला जणू ‘कुंभमेळ्या’चे स्वरूप प्राप्त होते. नदीकाठावर गर्दी उसळत असून, दोन दिवस धार्मिक व सांस्कृतिक वातावरणात परिसर न्हाऊन निघतो.

माजी शिक्षणमंत्री वसंतराव पुरके यांच्या वतीने यंदाही स्वखर्चाने नदीपात्राकडे जाण्यासाठी रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. मागील तीन दशकांपासून त्यांच्या वतीने महाप्रसादाचे वितरणही करण्यात येत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून यात्रोत्सवासाठी दरवर्षी विशेष तयारी केली जाते. पाण्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी बोटींची व्यवस्था करण्यात येते. तसेच राळेगाव पोलीस ठाण्याच्या वतीने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येतो.

श्रद्धा, परंपरा आणि लोकविश्वास यांचा संगम साधणारा जागजईतील हा उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात पार पडत असून, परिसरात धार्मिक एकात्मतेचे आगळेवेगळे दर्शन घडत आहे.

## ‘पाणी हक्क-अधिकार’ अभियानाची सुरुवात

प्रतिनिधी २ मे

**उमरखेड :** राज्यातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर एमपीजे या संघटनेतर्फे “पाणी हक्क-अधिकार” या राज्यव्यापी अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. पाणी हा केवळ संसाधन नसून जीवन, आरोग्य आणि सन्मानाशी निगडित मूलभूत हक्क असल्याचा संदेश या अभियानातून दिला जाणार आहे.

महाराष्ट्रात काही भागांत पाणी मुबलक असताना अनेक ठिकाणी भीषण टंचाई जाणवत आहे. महाराष्ट्र राज्य जल धोरण २०१९ अस्तित्वात असतानाही मोठा लोकसमुदाय पाणी असुरक्षिततेचा सामना करत आहे. राज्यातील सुमारे ४० ते ४५ टक्के भाग दुष्काळग्रस्त असल्याचे चित्र असून भूजल पातळीही सातत्याने घटत आहे. ग्रामीण व शहरी भागांत टँकरवरील अवलंबित्व वाढत असल्याने पाणी प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. भारतीय संविधानाचा अनुच्छेद २१ अंतर्गत पाणी हा जीवनाचा अविभाज्य भाग मानला जातो. याच पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करून त्यांना त्यांच्या हक्कांविषयी सजग करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. अभियानाअंतर्गत गावपातळीवर सभा, चौकसभा, जलहक्क व धोरणाचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण, पाण्याच्या गरजांचे सर्वेक्षण, माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मिळविणे, तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. पाणी पुरवठा आणि मागणी यांतील तफावत समजून घेऊन शासनाशी संवाद साधणे आणि उत्तरदायित्व निश्चित करणे यावरही भर दिला जाणार आहे. ही मोहीम केवळ पाण्यापुरती मर्यादित नसून सन्मानाने जगण्याच्या हक्काशी निगडित असल्याचे मत एमपीजेचे जिल्हाध्यक्ष फिरोज अन्सारी यांनी व्यक्त केले.

“पाणी हा हक्क आहे, दया नाही. नागरिकांनी आपल्या हक्कांसाठी पुढे येऊन सामूहिक उपाययोजनांसाठी एकत्र येणे आवश्यक आहे,” असे त्यांनी प्रशिक्षण शिबिरात सांगितले.

## तहानलेल्यांना दिलासा! गोदावरी अर्बनच्या पुढाकारातून पाणपोई

प्रतिनिधी २ मे




**पुसद :** कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने पुसद शहरात जनहिताचा अनोखा उपक्रम साकारण्यात आला. “गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., नांदेड” यांच्या पुसद शाखेच्या वतीने नागरिकांसाठी शुद्ध व थंड पाण्याची पाणपोई (जलसेवा) सुरू करण्यात आली.

वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिक, ग्राहक व प्रवाशांची तहान भागवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. ही सोसायटी केवळ आर्थिक सेवा देणारी संस्था नसून सामाजिक बांधिलकी जपणारी जबाबदार संस्था म्हणून ओळखली जाते, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील, अध्यक्षा पाटील तसेच संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. व्यवस्थापकीय संचालक तांबेकर सर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम प्रत्यक्षात उतरविण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन उपमहाव्यवस्थापक सुरेखा दवे व सहायक महाव्यवस्थापक रवी इंगळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. शाखेतील दैनिक अभिकर्त्यांच्या हस्ते फीत कापून पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे निर्माण होणाऱ्या पाणीटंचाई व नागरिकांच्या त्रासाचा विचार करून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. “सेवा हीच संस्कृती” या संस्थेच्या ध्येयाशी सुसंगत असा हा उपक्रम असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गोदावरी अर्बनने पुसदमध्ये पहिल्यांदाच अशी शुद्ध थंड पाणपोई सुरू करून नागरिकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या उपक्रमामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात स्वागत केले.

कार्यक्रमाला संस्थेचे अधिकारी, कर्मचारी, अभिकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती; भजन-शोभायात्रेतून ग्रामप्रबोधन



प्रतिनिधी २ मे

**उमरखेड :** तालुक्यातील मौजा बाळदी येथे जय गुरुदेव वारकरी सांस्कृतिक बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातील प्रमुख रस्त्यांवरून संतांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली.

शोभायात्रेत गावातील लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संतांच्या भजन-अभंगांच्या गजरात गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

अभंगांच्या माध्यमातून ग्रामविकास, ग्रामोद्धार आणि स्वावलंबी ग्रामनिर्मितीचा संदेश देत समाजप्रबोधन करण्यात आले. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन आणि जातिभेद निवारण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवरही विचार मांडण्यात आले. कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या सदस्या सौ. जिजाबाई देवबन गोस्वामी यांच्या हस्ते संतांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचा सन्मान करण्यात आला. भजनी मंडळातील मारोतराव बदकुले, बळीराम वानखेडे, अविनाश घुसे, देवबन गोस्वामी, शशीश दूधे, प्रकाश टिपरे, गजानन मिराशे, संभाजी पाटील, गजानन गायके आणि वामनराव दूधे यांनी सामूहिक प्रार्थना सादर केली. कार्यक्रमाची सांगता भक्तीमय वातावरणात करण्यात आली.

## शेंबाळपिंपरीत महाराष्ट्र दिन; सेवानिवृत्ती सत्कार

प्रतिनिधी २ मे



**शेंबाळपिंपरी :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत शेंबाळपिंपरीच्या वतीने ध्वजारोहण व सेवानिवृत्ती सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी जैनुल सिद्दीकी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना रऊफोद्दीन भाई सिद्दीकी, संग्राम देशमुख, उपसरपंच शेख अशपाक तसेच जैनुल सिद्दीकी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सरपंच तथा प्रशासक रवींद्र महल्ले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने परिसर दुमदुमून गेला.

प्राथमिक आरोग्य केंद्र शेंबाळपिंपरी येथे कनिष्ठ लिपिक म्हणून ११ वर्षे सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या राजू भाऊ जामकर (रा. इसापूर धरण) यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे जैनुल सिद्दीकी यांनी आपल्या मनोगतात महाराष्ट्र दिन, कामगार दिन, बौद्ध पौर्णिमा तसेच पवित्र जुम्मा शुक्रवाराच्या शुभेच्छा देत जामकर यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी निरोगी व समाधानी जीवनाच्या शुभेच्छाही दिल्या.

सरपंच रवींद्र महल्ले यांनी गेल्या पाच वर्षांत गावात जातीय सलोखा व सामाजिक एकोपा दृढ करण्यासाठी सर्व सण-उत्सव, जयंती-पुण्यतिथी एकत्र साजरे करण्याचा उपक्रम राबविल्याचे सांगितले.

याप्रसंगी आरोग्य विभाग, कृषी विभाग, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र दिनानिमित्त साजरा झालेला हा कार्यक्रम गावाच्या एकात्मतेचा आणि विकासाचा संदेश देणारा ठरला.

## महाराष्ट्र उद्योग रत्न २०२६ पुरस्काराने गोदावरी अर्बनचा गौरव

प्रतिनिधी २ मे



**यवतमाळ :** सहकार आणि आर्थिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत विस्ताराचे नवे मापदंड निर्माण करणाऱ्या गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीला महाराष्ट्र शासन पुरस्कृत “महाराष्ट्र उद्योग रत्न २०२६” या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नाशिक येथे आयोजित भव्य समारंभात सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोदावरी अर्बनच्या वतीने सचिव ॲड. रवींद्र रगटे, उपसरव्यवस्थापक रवी इंगळे तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गातून उत्कृष्ट उद्दिष्टपूर्ती करणारे भूषण काळमेघ यांनी हा सन्मान स्वीकारला.

३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेने सहा राज्यांमध्ये विस्तार साधत ३०७९ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ५५५५ कोटी रुपयांचा एकूण व्यवसाय नोंदवत सहकार क्षेत्रात लक्षणीय उच्चांक गाठला आहे. या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर संस्थेची दखल या पुरस्कारासाठी घेण्यात आली. विशेष म्हणजे, २०२३ मध्ये हाच “महाराष्ट्र उद्योग रत्न” पुरस्कार उद्योगविश्वातील दिग्गज रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला होता. त्यामुळे या सन्मानाला असलेली प्रतिष्ठा अधिक अधोरेखित होते. या यशानंतर संस्थेचे संस्थापक तथा विधान परिषद गटनेते आमदार हेमंत पाटील, अध्यक्षा राजश्री पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्यासह संचालक मंडळाचे अभिनंदन केले. नाशिक शाखेचे व्यवस्थापक आशिष तायडे यांचीही यावेळी उपस्थिती होती. सहकार क्षेत्रात वाढती व्याप्ती, आर्थिक शिस्त आणि सामाजिक उपक्रम यांचा समतोल राखत गोदावरी अर्बनने मिळवलेला हा सन्मान संस्थेच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

# पैनगंगा कोरडी; नदीकाठची गावे तहानलेली

### मुरलीजवळील कोट्यवधींचा बंधारा कोरडा; ईसापुर धरणाचे पाणी शेवटपर्यंत पोहोचत नाही

प्रतिनिधी २ मे



**उमरखेड :** तालुक्यातील पैनगंगा नदी काठच्या गावांवर यंदा भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवले असून “नदी गावात, पाणी डोळ्यांत” अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकेकाळी बारमाही वाहणारी ही जीवनदायिनी नदी सध्या पूर्णतः कोरडी पडली आहे. नदीपात्र वाळवंटासारखे ओस पडल्याने नागरिकांमध्ये हताशा पसरली आहे.

मुरली गावालगत २००६ साली सुमारे दोन कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला बंधारा सध्या पूर्णपणे कोरडा आहे. सहस्त्रकुंड धबधबा परिसरापासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या या बंधाऱ्यात पाण्याचा थेंबही शिल्लक नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. ईसापुर धरण येथून सोडले जाणारे पाणी शेवटच्या गावांपर्यंत पोहोचत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. देवसरी, लिंगी, देवरंगा, मंगरूळ, वाळकी, परोटी, इस्लापूर, मुरली व मुरली तांडा या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची भटकंती सुरू आहे. महिलांना हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल पायी जावे लागत असून, कोरड्या नदीपात्रात खड्डे खोदून ओलसर मातीतून थेंबथेंब पाणी गोळा करण्याची वेळ आली आहे.

> “पैनगंगा नदी जवळ असूनही आम्हाला पाण्यासाठी भटकंती करावी लागते, ही मोठी शोकांतिका आहे. महिला, पुरुष आणि लहान मुलांनाही पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. वन्यप्राणी आणि जनावरेही तहानेने व्याकुळ झाली आहेत. शासनाने तात्काळ ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.”
> - युवराज जाधव, मुरली

या भागातील पैनगंगा अभयारण्य परिसरातही पाण्याअभावी वन्यजीवांची अवस्था बिकट झाली आहे. पाणवठे आटल्याने प्राणी मानवी वस्त्यांकडे वळत असून मानव-वन्यजीव संघर्षाची भीती वाढली आहे. जनावरांसाठीही पाणीटंचाई निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

दरवर्षी उन्हाळ्यात ही समस्या उग्र रूप धारण करत असली तरी ठोस उपाययोजना अद्याप झालेल्या नाहीत. जलसंधारण, नदी पुनरुज्जीवन आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने तातडीने पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, या गंभीर प्रश्नाकडे लोकप्रतिनिधी व प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

नदीजवळ असूनही पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

## मंडळ अधिकारी राऊत यांचा सन्मान



प्रतिनिधी २ मे

**झरी जामणी :** तालुक्यातील माथार्जुन येथे मंडळ अधिकारी ऋषी विठ्ठल राऊत यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. ग्राम महसूल अधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला संजय थुल, संग्राम गिते, जगमित्र तुमरे, धिरज चव्हाण, राहुल चांदेकर, कौसर सय्यद यांच्यासह सर्व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते. महसूल सेवक लक्ष्मण गेडाम, मनोज आत्राम, विशाल गुरनुले, सतीश धुर्वे व वंदना चिकराम यांनीही सहभाग घेतला.

यावेळी उपसरपंच रविंद्र कायतवार, पोलिस पाटील प्रकाश गेडाम तसेच ग्रामस्थ भीमराव किनाके व गजानन राजुरकर यांच्या हस्ते राऊत यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

समारोप प्रसंगी राऊत यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव मांडत सहकाऱ्यांचे आभार मानले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले होते.

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# शेतजमिनीवरून झालेल्या वादातून मोठ्या भावाने केली धाकट्या भावाची हत्या

**अमरावती :** शेतजमिनीवरून झालेल्या कौटुंबिक वादातून मोठ्या भावाने केली धाकट्या भावाची हत्या केल्याची खळबळ जनक घटना अमरावती शहरात घडली आहे. या हल्ल्यात एक भाऊ जखमीही झाला आहे.

छाया नगर परिसरात घडलेली घटना, हल्ल्यात एक भाऊ जखमीही झाला आहे.

मोहम्मद मकसूद मोहम्मद लुकमान (५७) यांचा प्राणघातक हल्ल्यात मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी ए. तस्किन मोहम्मद लुकमान (६०) याला ताब्यात घेतले आहे. धाकटा भाऊ मोहम्मद नाझिम मोहम्मद लुकमान (५४) याने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. इतर दोन आरोपी, नाहिद काझी रहमान (दंतवैद्य) आणि सालेकीन अब्दुल सलीम काझी यांचा शोध सुरू आहे. नागपुरी गेट पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.

# तहसील कार्यालयात आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी २ मे



**अमरावती :** महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालय, अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या माननीय आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या थोर महापुरुषांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमास अनिल भटकर, उपविभागीय अधिकारी, अमरावती, विजय लोखंडे, तहसीलदार, अमरावती, सुनील रासेकर, नायब तहसीलदार, अमरावती, टीना चव्हाण, तहसीलदार, श्रीकृष्ण गाडेकर, राजेश दवणे तसेच तहसील कार्यालयातील मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजवंदन

प्रतिनिधी २ मे



**अमरावती:** जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या स्थापनानिमित्त आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीतानंतर जिल्हाधिकारी येरेकर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चाफले, तहसिलदार निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनाच्या वर्धापन दिनी विभागीय आयुक्तालयात ध्वजारोहण व मानवंदना

प्रतिनिधी २ मे



**अमरावती:** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या वर्धापन दिनोत्सवा निमित्त अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात प्रभारी विभागीय आयुक्त तथा अपर आयुक्त अजय लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. लहाने यांनी यावेळी उपस्थित सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर पोलीस पथकाव्दारे तिरंग्यास मानवंदना देण्यात आली.

यावेळी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे-पाटील, अपर आयुक्त संजय जाधव, सुरज वाघमारे, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार मधुकर धुळे, श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनी राणा दाम्पत्याकडून सत्कार



प्रतिनिधी २ मे

**अमरावती :** आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी सफाई कामगारांचे सत्कार केला. कामगार दिवस निमित्ताने कामगारांचे सत्कार कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

अमरावती येथील शंकर नगर मधील युवा स्वाभिमान पार्टी कार्यालयात आज कामगार दिनानिमित्त शहरातील विविध क्षेत्रातील काम करणारे सफाई कामगार यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत रवी राणा यांच्यासह अंजनगाव सुर्जीचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले उपस्थित होते.

# महानगरपालिकेत महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी २ मे

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेत महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा स्थापना दिवसानिमित महानगरपालिकेचे मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला. शुक्रवार दिनांक १ मे, २०२६ रोजी अमरावती मनपाच्या प्रांगणात सदर ध्वजारोहन कार्यक्रम सकाळी ठिक ७.१५ मिनिटांनी घेण्यात आला.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा स्थापना दिवसाच्या मंगलमय प्रसंगी, अमरावतीच्या जनतेला व उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.



महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी आपल्या भाषणात सांगीतले की, आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा आहे. १ मे १९६० रोजी आपल्या महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि आपल्या सर्वांच्या स्वप्नांना एक नवी दिशा मिळाली. हा दिवस केवळ राज्यनिर्मितीचा नसून, आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि एकतेचा उत्सव आहे.

आजपासून सुरू होत असलेल्या जनगणना अंतर्गत स्व-गणना उपक्रमाचाही उल्लेख करावासा वाटतो. ही प्रक्रिया प्रत्येक नागरिकाला स्वतःची माहिती अचूक व पारदर्शक पद्धतीने नोंदवण्याची संधी देते. शहराच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या सर्व पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका आणि अधिकारी वर्ग यांचे विशेष अभिनंदन केले व आभार मानले. त्यांच्या समन्वयातून आणि परिश्रमातूनच शहराचा सर्वांगीण विकास शक्य होत आहे.

यावेळी वंदेमातरम, महाराष्ट्र राज्यगीत (समूहगीत) सादरीकरण करण्यात आले. सदर महाराष्ट्र राज्यगीत सादरीकरण विजय खंडारे सर यांनी केले. यावेळी महानगरपालिका मराठी माध्यमिक मुलांची शाळा वडरपुरा येथील विद्यार्थ्यांच?या बँन्ड पथकाने यावेळी राष्ट्रगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय खंडारे सर यांनी केले. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. या ध्वजारोहण कार्यक्रमात स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, झोन सभापती सौ.स्वाती कुलकर्णी, ईस्माईल कासम लालुवाले, नगरसेवक आशिष अतकरे, सचिन वैद्य, नगरसेविका सौ.सुरेखा लुंगारे, सौ.सुनिता भेले, सौ.विद्या माटे, सौ.सुनिता लोणारे, सौ.ललिता रतावा, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक तथा मुख्य लेखाधिकारी श्यामसुंदर देव, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मंगेश कडू, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, कार्यालय अधिक्षक गुलशन मिरानी, उपअभियंता, अभियंता, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य

प्रतिनिधी २ मे

## ♦ २० मेपर्यंत नोंदणीचे आवाहन

**अमरावती :** राज्यात दि. १४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, दि. १५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या शेतकरी बांधव-भगिनींनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही, त्यांनी दि. २० मेपर्यंत नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यात एकूण १.७१ कोटी खातेदार असून त्यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी पूर्ण केली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी २० मे २०२६ पूर्वी आपला फार्मर आयडी तयार करून घ्यावे. शेतकरी नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर जाऊन अथवा स्वतः ॲग्रीस्टॅक पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करू शकतात. यापुढे कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच बियाणे, खते, औषधे आदी कृषी निविष्ठा प्राप्त करण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक राहणार आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात काही अडचण आल्यास संबंधित विभागाच्या हेल्पडेस्कशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अमरावती विभागासाठी अजितकुमार गेजगे (९६५७१०९८०९), पुणे विभाग करिता संगीता ननावरे (७५८८५०९४९२), कोकण विभागसाठी सोनाली वाडेकर (९४०४९५३५१८), छत्रपती संभाजीनगर विभाग शीतल कौदरे (९१७२३१९६३७), नागपूर विभाग अजितकुमार गेजगे (९६५७१०९८०९) व नाशिक विभाग सोनाली वाडेकर (९४०४९५३५१८) यावर संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाव्दारे करण्यात आले आहे.

# विभागीय आयुक्तालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन

प्रतिनिधी २ मे

**अमरावती :** 'ग्रामगीता'चे रचयिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण विनम्र अभिवादन केले.



यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# ब्रिटिशकालीन धोकादायक पूल दुर्लक्षित

प्रतिनिधी २ मे

**अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील आदिवासी भागातील ब्रिटीश कालीन पुल तुटन्याच्या स्थितित आहेत त्यांची मुदत संपलेली आहे. त्या बद्दल ब्रिटिश सरकार चे पत्र सुद्धा भारत सरकार ला आलेले आहेत या कामांना तत्का ळ मान्यता द्यावी व व्याघ्र प्रकल्पनी परवानगी द्यावी त्याचबरोबर असतीत्वातील रस्त्यांना सुद्धा परवानगी द्यावी.

अशी मागणी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी केली आहे.

अन्यथा शांत असलेला आमचा आदिवासी बांधव आक्रमक भुमिका घेऊन आंदोलन करेल



एकीकड़े जनहितार्थ कामांना अड़विले जाते दुसरीकड़े दिल्ली वाईल्ड बोर्डाची कुठलीही परवानगी नसतांना व्याघ्र प्रकल्प मधिल अंतर्गत शेकड़ो हेक्टर जमीनिचे या विभागा मार्फ़त खोदकाम केले जात आहेत जेसीबी ने रस्ते बनविले जात आहेत याची केंद्रीय समिति मार्फ़त चौकशी झाली पाहिजे अशी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांची मागणी आहे.

# पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

प्रतिनिधी २ मे

## गुन्हे शाखेने घेतले आरोपी ताब्यात

**अमरावती :** गुन्हे शाखेच्या पथकाने जुगार अड्ड्यावर धाड टाकून ६ आरोपींना ताब्यात घेतले आहे.

आज रोजी गुन्हे शाखेच्या पथकाने पोस्टे गाडगेनगर हद्दीतील विलासनगर येथे आरोपी गोपी पटेल याचे अवैध रित्या चालू असलेल्या जुगार अड्यावर छापा टाकून कारवाई केली. असता सदर ठिकाणी जुगार खेळताना ०६ आरोपी मिळून आले व ०२ फरार झाले.

जप्त मुद्देमाल मध्ये त्यांच्या ताब्यातून नगदी ६५३९०, ०६ मोबाईल किंमत १,३०,००० ०२ मोटार सायकल १,६०.०००, जुगार अड्यावरील इतर साहित्य ३०,६०० असा एकूण ३,८५,९०० रु किमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे.

एकूण ८ आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

ताब्यात घेतलेले आरोपी मध्ये नंदकिशोर जाणवरावजी सत्रे वय ५० रा. नांदगाव पेठ अमरावती, रवी ओंकार मोंढे वय ५० वर्ष महेंद्र कॉलनी अमरावती , रमेश राठोड व ३९ वर्षे महेंद्र कॉलनी अमरावती, महेश महादेवराव चौधरी वय ५४ वर्ष सहकार नगर अमरावती, शेख करीम व ४१ वर्ष महेंद्र कॉलनी अमरावती, रोहन गजानन थोरात १९ वर्ष कपिल वस्तू नगर अमरावती यांचा समावेश आहे.फरार आरोपी मध्ये गोपी पटे, जयपाल मेघनानी यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण आणि त्यांच्या टीमने केली आहे.

# जिल्ह्याच्या कृषी-औद्योगिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानावर भर : बाबासाहेब पाटील

प्रतिनिधी २ मे

**अमरावती :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि उद्योग क्षेत्राचा विकास करून जिल्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या निमित्ताने पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे मुख्य शासकीय समारंभ आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी सहकार मंत्री श्री. बाबासाहेब पाटील बोलत होते. पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, उपायुक्त अजय लहाने आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहे. मोर्शी आणि वरुड येथील सिट्रस इस्टेटमध्ये आता एआय आधारित तंत्रज्ञान राबविले जाईल.

सिंचनासाठी 'प्रती थेंब अधिक पीक' योजनेत ३ हजार ५५९ आणि मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेत २ हजार १५३ लाभार्थींची निवड झाली आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत अमरावती जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला असून ही जिल्हावासियांसाठी अभिमानाची बाब आहे.

जिल्ह्याच्या औद्योगिक विकास आणि महिला सक्षमीकरणावर भर देण्यात येत असल्याचे सांगून सहकार मंत्री पाटील पुढे म्हणाले, अमरावतीमध्ये 'पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क' आणि विमानतळावरील नाईट लँडिंग सुविधेमुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. औद्योगिक वसाहतीत आयटी पार्क आणि आशियातील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र आकारास येत आहे. रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत १ हजार ५५ कर्ज प्रकरणे मंजूर झाली असून, यात ६३३ महिला उद्योजिकांचा समावेश आहे.

पर्यटन क्षेत्रात चिखलदरा येथील स्कायवॉक पूर्ण करण्यावर भर दिला जात असून आमझरी गावाची 'मधाचे गाव' म्हणून निवड झाली आहे. तसेच, संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट' विकसित करण्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. देशाच्या पहिल्या डिजिटल जनगणनेत नागरिकांनी अचूक माहिती भरून सहकार्य करावे, असे आवाहन श्री. पाटील यांनी यावेळी केले. महाराष्ट्र दिनानिमित्त आणि जागतिक कामगार दिनानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सन २०२४-२५ या वर्षासाठी 'विशेष जिल्हा युवा पुरस्कार' नाळ चित्रपट फेम बालकलाकार श्रीनिवास पोकळे, युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य केल्याबद्दल युवक गटातून अमर वानखडे (तिवसा), युवती गटातून कु. जानव्ही राऊत (नया वाठोडा) तसेच संस्था गटातून श्री. संताजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था (गुरुकुंज आश्रम) यांना सन्मानित करण्यात आले. यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार, व्यसनमुक्ती, रक्तदान आणि आदिवासी विकास क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी युवक गटात समाजप्रबोधनकार वेदांत मुंदाने (अमरावती), युवती गटात कु. पुजा गुंजरकर (ब्राम्हणवाडा थडी) आणि संस्था गटात स्वामी विवेकानंद विचार मंच (अचलपूर) यांना सन्मानित करण्यात आले. अचलपूरच्या विवेकानंद विचारमंचने आरोग्य सेवा आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले आहे. याशिवाय अपर आयुक्त सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे , सहायक ग्रंथालय संचालक राजेश पाटील, सहायक ग्रंथालय संचालक सुरजकुमार मडावी, अधीक्षक अभियंता मंगेश पाटील, महसूल सहायक मनीषा ढोके, शिक्षिका रितू तळमळे, ग्राम महसूल अधिकारी पवन मुंडे, जिल्हाधिकारी कार्यालयाचे संजय अंबाडेकर, जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाच्या सुमेधा बारलिंगे, मंजिरी महाजन, संध्या साउरकर, कविता पाचघरे, पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्रीधर गुळसुंदरे, पोलीस उपनिरीक्षक योगेश श्रीवास, अजय मिश्रा, प्रवीण काळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय पेठे, होमगार्ड सैनिक राजेंद्र शाहाकार, पोलीस हवालदार राजेश कोचे, राजीव बाहेनकर, दीपक सुंदरकर, शंकर बावनकुळे, पंकज गावंडे, उज्ज्वल सामुद्रे, सुरक्षारक्षक शिवकुमार तायडे यांना उत्कृष्ट कार्याबाबत यावेळी गौरविण्यात आले.

प्रारंभी विविध शासकीय विभागामार्फत परेड संचलन करण्यात आले. मंत्री श्री. पाटील यांनी परेड संचलनाचे निरीक्षण केले. परेडचे संचलन परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी सागर भामरे तसेच दुय्यम परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक श्रीधर गुळसुंदरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि २ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्याला अधिक प्रगत, समृद्ध आणि आदर्श बनवू या -पालकमंत्री






●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण सर्वांनी एकदिलाने, समन्वयाने आणि ठोस कृतीतून प्रयत्न करण्याची गरज आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा त्यात तितकाच सहभाग महत्त्वाचा आहे. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत संतुलित प्रगती साधत, स्थानिकांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. महिला सक्षमीकरण, युवकांचे कौशल्य विकास, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धन यावर विशेष भर देत आपण पुढे गेलो, तर वाशिम जिल्हा केवळ प्रगतच नव्हे तर समृद्ध आणि आदर्श जिल्हा म्हणून राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण करेल असे प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केले.

महाराष्ट्र दिनाच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शासकीय समारंभात राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.यावेळी शुभेच्छा संदेश देताना पालकमंत्री ना.भरणे बोलत होते. यावेळी विधानपरिषद सदस्य आ. किरणराव सरनाईक,जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान,अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,अपर पोलीस अधीक्षक लता फड,उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल आदी उपस्थित होते. पालकमंत्री ना.भरणे पुढे बोलतांना म्हणाले की, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ४ लाख हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून त्यामध्ये ३ लाख हेक्टरवर सोयाबीन तर ६५ हजार हेक्टरवर तुर पिक प्रस्तावित आहे. शेतकऱ्यांकडे दीड लाख क्विंटल घरचे बियाणे उपलब्ध असून खतांचे ७८ हजार मेट्रिक

*** महाराष्ट्र दिनाचा ६६ व्या वर्धापन दिनाचा शासकीय समारंभ साजरा**
***पोलीस कवायत मैदान येथे पालकमंत्री यांच्याहस्ते राष्ट्रध्वजवंदन**
***उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार**
***शेतकऱ्यांसाठी महाबीजच्या चार महत्त्वपूर्ण उत्पादनांचे लोकार्पण**




टन आवंटन मंजूर आहे. युरिया व डीएपीचा साठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे. 'महाविस्तार एआय' ॲपद्वारे शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती दिली जात आहे. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेत ४ कोटी तर यांत्रिकीकरणासाठी १५ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

पालकमंत्री ना. भरणे यांनी एल निनोच्या पार्श्वभूमीवर यंदा सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून संभाव्य परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी सांगितले तसेच हीट वेव्हच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी खबरदारी बाळगून आरोग्याची काळजी घ्यावी.असे आवाहन केले. प्रारंभी पालकमंत्री ना. भरणे यांनी पोलिस पथ संचलनाचे निरिक्षण करुन संचलनाची मानवंदना स्वीकारली.यानंतर स्वातंत्र्यसैनिक आणि उपस्थित नागरिकांची भेट घेऊन त्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.यानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी व कर्मचारी,खेळाडू, संस्था आदींचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ आणि शेती अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने महाबीजकडून चार महत्त्वपूर्ण उत्पादने आजपासून उपलब्ध करून देण्यात आली आहेत.पालकमंत्री ना .भरणे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.यामध्ये आर व्ही एस एम हे सोयाबीनचे क्रांतिकारक वाण, पिकांवरील किडींच्या प्रभावी नियंत्रणासाठी निमास्त्र हे अतिसूक्ष्म निंबोळी पावडर, महा स्पीड हे जलद विघटक तसेच महाबीज कर्बमापकाचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत व नायब तहसीलदार अर्चना घोळवे यांनी केले. यावेळी लोकप्रतिनिधी,अधिकारी कर्मचारी वर्ग, स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबीय,पत्रकार आणि नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात

### इन्नाणी महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●



कारंजा येथील इन्नाणी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य स्थापना दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.आर.एम.पाटील उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गीत'वंदे मातरम्' च्या सामूहिक गायनाने करण्यात आली. या कार्यक्रमास प्रा.अतुल बरडे, प्रा.डॉ. माथुरकर, डॉ.जाधव, प्रा. ललित खरड,सुयोग काळबांडे मुख्याध्यापक, प्रा.तारिक खान मुख्याध्यापक, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.सर्वांच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक उत्साहपूर्ण व यशस्वी ठरला कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक प्रा.सुमित अमलेकर यांनी केले.

### स्पेलबी स्पर्धेमध्ये पोटी जि प शाळेला घवघवीत यश



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

जिल्हा परिषद शिक्षण विभाग वाशिम आणि ओपन लिंक्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद शाळा पोटी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. यापैकी इयत्ता पाचवी मध्ये जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक कु. ज्ञानेश्वरी विलास शिंदे व तृतीय क्रमांक कु. जागृती योगेश गावंडे यांनी पटकावला तर इयत्ता सहावी मधून कु. प्रियंका विलास शिंदे हिने प्रथम क्रमांक पटकावला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील सहाही तालुक्यातून प्रतिभावान विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्येक वर्गातून तीन विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम मा.अर्पित चव्हाण व शिक्षणाधिकारी प्राथमिक मा. संजय ससाने यांचे हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन भव्य समारंभात गौरविण्यात आले स्पेल बी स्पर्धेसाठी शाळेतील शिक्षक शरद सुरसे, कु.भारती गावंडे, दत्तात्रय दिघडे, आशिष डोंगरे, कु. राजश्री श्रीखंडे, यांनी अथक परिश्रम केले.

### हराळ येथील युवक अकोला येथे बेपत्ता !



●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

तालुक्यातील हराळ येथील ३२ वर्षीय युवक अकोला येथे आपल्या आई व भाऊ सोबत उपचारासाठी गेलेला युवक बेपत्ता झालेला आहे.ही घटना दिनांक २७ एप्रिल २०२६ ची असून परिवाराकडून अकोला येथील सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनला बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र आज (२ मे) रोजी पर्यंत त्याचा कोणत्याही प्रकारचा पत्ता लागला नसल्याने त्याचे परिवाराचे सदस्य चिंतेत आहेत. सोपान धोंडूबा खाडे उर्फ बंडू वय ३२ वर्ष असे बेपत्ता झालेल्या युवकाचे नाव असून तो दिनांक २७ एप्रिल रोजी आपली आई व भाऊ सोबत मानसिक आरोग्याची स्थिती ठीक नसल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सोपान खाडे यांना उपचारासाठी अकोला येथे नेण्यात आले होते मात्र तेथे पोहोचताच ते गाडीतून उतरून अचानक पळून गेल्याचे सांगण्यात आले.आई व भावाने त्याचा इतरत्र खूप शोध घेतला. तसेच त्यांचे बंधू ज्ञानेश्वर धोंडोबा खाडे यांनी त्यांचा शोध सुरू केला असून, परिसरात शोधमोहीम राबविण्यात येत आहे.

## लग्नानंतर परिक्षा केंद्रात थेट, शिक्षणाचे महत्व ग्रेट !

### वैष्णवी काळे ठरली जिद्दीचे प्रेरणादायी उदाहरण



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या क्षणांपैकी एक असलेल्या लग्नाच्या दिवशीही शिक्षणाची कास न सोडता परीक्षेला उपस्थित राहून वैष्णवी काळे हिने जिद्द, चिकाटी आणि शिक्षणावरील निष्ठेचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे.भटउमरा येथील चि. सौ. का. वैष्णवी संतोष काळे हिचा विवाह दि. २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता येथीलच चि. ज्ञानेश्वर राजू चौधरी यांच्याशी आनंदात संपन्न झाला.



साधारण परिस्थितीतून आलेल्या या कुटुंबांनी सोहळा पार पाडत असतानाच वैष्णवीसमोर मोठे आव्हान उभे होते. ती रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयात बीएसडब्ल्यू (ऐं) द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी असून, तिचा महत्त्वाचा पेपर हाच दिवशी दुपारी २ वाजता वाशिम येथील राजस्थान कॉलेज येथे नियोजित होता.लग्न आणि परीक्षा एकाच दिवशी आल्याने कोणालाही गोंधळ उडाला असता; मात्र वैष्णवीने शिक्षणाला प्राधान्य देत लग्नसोहळा आटोपताच वेळ न दवडता थेट परीक्षा केंद्र गाठले आणि आपला पेपर पूर्ण केला. तिच्या या निर्णयामुळे उपस्थित नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिक भारावून गेले.माता जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणासाठीच्या संघर्षमय कार्यातून प्रेरणा घेत वैष्णवीने हा धाडसी निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. तिच्या या कृतीमुळे 'परिस्थिती कोणतीही असो, शिक्षणाची वाट कधीही सोडू नये' हा संदेश समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचला आहे.वैष्णवीच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत असून, इतर मुलींनीही शिक्षणाला प्राधान्य देत स्वतःच्या पायावर उभे राहावे, असा प्रेरणादायी संदेश या घटनेतून मिळत आहे.

## सेतूसेवा ठप्प, प्रशासन गप्प !

### विविध प्रमाणपत्रासाठी नागरिकांचे हेलपाटे

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●



गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यातील सेतू केंद्रांची ऑनलाइन साईट बंद असल्याने विविध प्रमाणपत्रांचे वितरण पूर्णपणे ठप्प झाले आहे. यामुळे रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, सातबारा उतारा तसेच शिक्षण व शासकीय कामकाजासाठी आवश्यक असलेली विविध कागदपत्रे मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार सेतू केंद्रावर हेलपाटे मारावे लागत आहेत. परिणामी नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी सेतू सुविधा केंद्रावर येत असतात. मात्र, साईट बंद असल्यामुळे अर्जांची प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रिया, शिष्यवृत्ती, नोकरीसाठी अर्ज आणि इतर शैक्षणिक कारणासाठी लागणारी प्रमाणपत्रे वेळेत मिळत नसल्याने त्यांचे मोठे नुकसान होत आहे. याशिवाय, वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक असलेले उत्पन्न प्रमाणपत्र उपलब्ध होत नसल्याने अनेक गरजू रुग्णांच्या शस्त्रक्रिया आणि उपचार प्रक्रियाही रखडल्या आहेत. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी उत्पन्न प्रमाणपत्र अनिवार्य असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

## राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके सन्मानाने वाशीमचा मान उंचावला !

### चार आरोग्य संस्थांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते गौरव

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेने गुणवत्ता सिद्ध करत राष्ट्रीय पातळीवर ठसा उमटवला असून, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके प्रमाणपत्राने गौरविण्यात आलेल्या चार आरोग्य संस्थांचा महाराष्ट्र दिनी दिमाखदार सन्मान करण्यात आला.

राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदानावर झालेल्या मुख्य शासकीय समारंभात हा गौरव सोहळा पार पडला.यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.राष्ट्रीय स्तरावरील कठोर मूल्यमापन प्रक्रियेत यश मिळवलेल्या ग्रामीण रुग्णालय, मालेगाव, प्राथमिक




आरोग्य केंद्र, मेडशी (ता. मालेगाव), आरोग्य उपकेंद्र, कवठळ (ता. मंगरूळपीर) आणि आरोग्य उपकेंद्र, लोणी (अरब) (ता. कारंजा) या संस्थांच्या प्रमुखांचा यावेळी गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता निर्माण करून नागरिकांचा विश्वास संपादन करणे ही महत्त्वाची बाब आहे. १४ वर्षांच्या मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करत पालकांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. समारंभामुळे आरोग्य विभागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, गुणवत्तापूर्ण सेवेकडे वाटचाल अधिक वेगाने होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येत निर्धारित कालावधीत स्वगणना पूर्ण करावी -ना.दत्तात्रय भरणे



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येत निर्धारित कालावधीत स्वगणना पूर्ण करावी. अचूक व विश्वसनीय माहितीच्या आधारे शासनाचे विकासनियोजन अधिक प्रभावी होत असल्याने प्रत्येकाने जबाबदारीने सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.असे आवाहन राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना दत्तात्रय भरणे यांनी केले.

जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणना उपक्रमाचा शुभारंभ पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाला. त्यांनी स्वतः स्वगणना करून मोहिमेला प्रारंभ केला. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना पालकमंत्री ना भरणे म्हणाले, 'जनगणना २०२७' अंतर्गत पहिला टप्पा 'स्व-गणना' हा १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणकांकडून घरोघरी भेट देऊन प्रत्यक्ष घरगणना करण्यात येईल. प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलित करताना प्रगणकांना सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. स्वगणना ही प्रक्रिया सुलभ व वेळेची बचत करणारी असून डिजिटल माध्यमातून सहज पूर्ण करता येते, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा जनगणना अधिकारी वैशाली देवकर, निलेश पळसकर यांच्यासह क्षेत्रीय प्रशिक्षक उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केली स्व-गणना



देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या जनगणना २०२७ प्रक्रियेला आजपासून औपचारिक सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी ऑनलाईन पद्धतीने 'स्व-गणना' पूर्ण केली.

यावेळी जनगणनेच्या अनुषंगाने देशाच्या नियोजनासाठी लागणारी माहिती अचूक भरावी, तसेच जनकल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलित करताना प्रगणकांना सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. यासाठी केंद्र शासनाने https://se. census. gov.in/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून दिले असून नागरिकांनी आपल्या कुटुंबाशी संबंधित माहिती अचूकपणे भरावी. माहिती भरल्यानंतर ती पुन्हा तपासून सादर करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

## अट्टल चोरट्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या !

### *२ लाख ९९ हजारांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



वाशिम जिल्ह्यात बस व रेल्वेमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लक्ष्य करून चोरी करणाऱ्या अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेने अखेर बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्यांकडून चोरी केलेले १३ मोबाईल,सोने,चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ९९ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलं आहे.राजकुमार उर्फ साधू कडू डोडे .वय ३३, रा. नेपानगर, जि. बुरहानपूर, मध्यप्रदेश असे या अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि. ९ जानेवारी २०२६ रोजी रामदास तुकाराम सर्जेराव .रा. पिंपळशेंडा, ता. मालेगाव, जि. वाशीम हे मालेगावहून वाशीमकडे बसने येत होते.दरम्यान अकोला नाका परिसरात त्यांच्या खिशातून अज्ञात चोरट्याने २८ हजार सहाशे रुपयांची रोकड लंपास केली होती.या प्रकरणी वाशीम शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, १ मे २०२६ रोजी आरोपी पुन्हा वाशीममध्ये चोरी करण्यासाठी आला आहे. माहितीच्या आधारे अकोला नाका परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले.

चौकशी दरम्यान त्याने संबंधित गुन्ह्याची कबुली दिली. यावरून त्याच्याकडून ९ हजार पाचशे रुपये रोख, विविध कंपन्यांचे १३ मोबाईल किंमत १लाख ९५ हजार रुपये , ३ ग्रॅम सोने , १६ तोळे चांदी किंमत ९५ हजार रुपये असा एकूण २ लाख ९९ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.याशिवाय आरोपीने नांदेड, भुसावळ आणि वाशीम येथेही मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली असून गुन्ह्यांचा पुढील तपास सुरू आहे. आरोपीला पुढील कारवाईसाठी वाशीम शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी , पोउपनि. निलेश जाधव आणि त्यांच्या पथकाने केली.

## नेत्रदानकर्त्यांच्या कुटुंबीयांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●




मानवतेचा उज्ज्वल संदेश देणाऱ्या मरणोत्तर नेत्रदानाच्या कार्याला महाराष्ट्र दिनी वाशिममध्ये सलाम करण्यात आला. नेत्रदान केलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांचा सन्मान करून त्यांच्या सामाजिक योगदानाची कदर करण्यात आली. राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, डॉ. अनिल कावरखे, डॉ. अविनाश पुरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, डॉ. आशिष बेदरकर यांची उपस्थिती होती. यावेळी विकास निवृत्ती वानखेडे, प्रताप अर्जुन धबाले, गजानन कडूजी ठाकरे, संतोष पुरुषोत्तम वाघमारे, मालती राजेंद्र दाभाडे, रवींद्र माधवराव पाटील, कुंडलिक परसराम चोपडे यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला.

नेत्रदान ही दुसऱ्याला नवे आयुष्य देण्याची संधी असल्याचे सांगत पालकमंत्री भरणे यांनी नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन केले. समाजात या उपक्रमाबाबत जागरूकता वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

शनिवार, दि. २ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# विवरा येथे शिवसेना ( उबाठा ) पदाधिकाऱ्यांचे नाला व अपूर्ण रस्त्यासाठी नाल्यातच आमरण उपोषणाला सुरुवात

प्रतिनिधी २ मे

**मलकापुर :** ग्राम विवरा येथील नाला खोलीकरण काम संबंधित ठेकेदाराने अपूर्ण सोडले असून ते काम पूर्ण करण्यात यावे व विवरा -रणगांव अपूर्ण राहिलेला रस्ता पूर्ण करण्याच्या मागणीसाठी विवरा येथील महिला व ग्रामस्थांसह शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास आदिंच्या प्रमुख उपस्थितीत नाल्यातच आज दि.१ मे २६ रोजी महाराष्ट्र दिनी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मागील वर्षी १६ सप्टेंबर २५ रोजी विवरा येथे ढगफुटी होऊन अतिवृष्टी झाली होती त्या अतिवृष्टी पावसाचे पाणी ग्रामस्थांच्या घरात घुसून शेकडो ग्रामस्थांचे नुकसान झाले होते मंजुर झालेला नाला खोलीकरण काम पूर्ण करण्यात यावे, तसेच मौजे विवरा -रणगांव रस्ता मंजूर असून त्या रस्त्यामध्ये गावाजवळ दलित वस्ती असून संपूर्ण गावातील सांडपाणी दलित वस्तीला लागून साचलेले असते त्या ठिकाणी नाली बांधकाम करून रस्ता कॉंक्रिटीकरण करून पूर्ण करण्यात यावा अन्यथा दि.१ मे महाराष्ट्र दिनी त्या सांडपाण्यात ग्रामस्थांसह आमरण उपोषण करण्याचा इशारा दि.२८ एप्रिल २६ रोजी निवेदनाद्वारे तहसीलदार समाधान सोनवणे यांना दिला होता, शिवसेना (उबाठा ) ने दिलेल्या निवेदनाची प्रशासनाने दखल न घेतल्याने आज १ मे रोजी उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास यांच्या नेतृत्वात साखराबाई तायडे, विजया राणे, नलुबाई वाडसे, संगीता तायडे, विमलबाई तायडे, ज्योती तायडे, कमल बंड, कांता तायडे, वसला तायडे, सरला तायडे, बळीराम राणे, शेषराव तायडे, सुखदेव वाढसे, देवराव तायडे, अभिजीत तायडे, विष्णू राणे, प्रदीप हिरळकर, प्रमोद डमाळे, गणेश कडू, रामदास संबारे, दयाराम बोदडे,समाधान सोनोने,भगवान धांडे, ओंकार पाटील, भूषण पाटील, गजानन ढोण, गजानन नाफडे, घनश्याम चोपडे, गणेश वाडसे, वासुदेव वाडसे, मधुकर पाटील, अर्जुन चोपडे, प्रशांत कडू,सोनु सोनोने, अमीत राजपूत, प्रशांत तायडे, नंदकिशोर झाल्टे, ईश्वर पाटील, राहुल पाटील, मोहन चोपडे, रोशन बोदडे, ज्ञानेश्वर भगत, यश झाल्टे सह ग्रामस्थांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

◆ तहसीलदार यांना शिवसेना (उबाठा) ने दिलं होतं निवेदन



# नगर पालिकेत विरोधकांचा सभात्याग

प्रतिनिधी २ मे

**जळगाव जा. :** २९ एप्रिल रोजी झालेल्या नगर परिषद सर्वसाधारण सभेमध्ये विरोधी सदस्यांवर अन्याय झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सांगितले की, त्यांना सभेमध्ये सार्वजनिक प्रश्न मांडण्याचा व बोलण्याचा अधिकार नाकारण्यात

आला तसेच नियमांचा आधार घेऊन त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला. या कथित अलोकशाही वागणुकीच्या निषेधार्थ विरोधी सदस्यांनी सभागृहाचा त्याग (सभात्याग) केला मागण्यांची निवेदन अध्यक्ष व मुख्य अधिकाऱ्यांना दिले. विरोधी पक्षाच्या सर्व महिला नगरसेविकांना अद्याप स्वतंत् केबिन उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे नागरिकांची कामे करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही नमूद करण्यात आले. विरोधी पक्षाने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, संबंधित सभेची व्हिडिओ रेकॉर्डिंग व कार्यवाहीची प्रत देण्याची मागणीही केली आहे.

# खामगाव येथे 'संस्कारांनी सशक्त बालपण' चार दिवसीय समर कॅम्पचे आयोजन

प्रतिनिधी २ मे

**खामगाव :** स्थानीय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या खामगाव सेवा केंद्राच्या वतीने मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी 'संस्कारांनी सशक्त बालपण' या चार दिवसीय समर कॅम्प चे आयोजन करण्यात आले आहे. हा कॅम्प ३ मे ते ६ मे दरम्यान दररोज सकाळी ८ ते १०.३० या वेळेत ब्रह्माकुमारी सेंटर रायगड कॉलनी खामगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

या समर कॅम्प मध्ये ८ ते १४ वयोगटातील मुलांसाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकास लक्षात घेऊन विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. कॅम्प मध्ये मुलांना सोप्या व रोचक पद्धतीने राजयोग ध्यान शिकविण्यात येणार असून त्यामुळे त्यांची एकाग्रता व स्मरणशक्ती वाढण्यास मदत होईल तसेच प्रेरणादायी कथा व विविध एक्टिव्हिटीजच्या माध्यमातून मुलांमध्ये नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जडणघडण केली जाईल. आर्ट अँड क्राफ्ट संस्कार आधारित खेळ टीम-बिल्डिंग ?क्टिव्हिटीज, म्युझिकल एक्सरसाइज,नृत्य ,गीते व इतर मनोरंजक उपक्रमाद्वारे मुलांचा आत्मविश्वास व्यक्तित्व विकास व सर्जनशीलता वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. या कॅम्पचा मुख्य उद्देश मुलांमध्ये सकारात्मक विचारसरणी, चांगल्या सवयी व उत्तम संस्काराची जडणघडण करणे हा आहे ज्यामुळे त्यांचे भविष्य उज्वल व संतुलित घडण्यास मदत होईल कॅम्पच्या शेवटच्या दिवशी ६ मे रोजी सायंकाळी ५ ते ६ या वेळेत पालकांसाठी 'संस्कारवान, आत्मविश्वासी व आनंदी मुलांची जडणघडण' या विषयावर विशेष पॅरेंटिंग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे या सत्रांमध्ये पालकांना मुलांच्या विकासासाठी उपयुक्त मार्गदर्शन केले जाणार आहे .खामगाव सेवा केंद्राच्या संचालिका शकुंतला दीदी यांनी ब्रह्माकुमारीजद्वारे आयोजित निशुल्क समर कॅम्प चा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आव्हान केले आहे.

# महामार्गावर ट्रकच्या धडकेत ट्रॅक्टर उलटून दोन ठार

प्रतिनिधी २ मे

◆ चार जण गंभीर जखमी, मलकापूर तालुक्यातील घटना

**मलकापूर :** भरधाव ट्रकच्या जबर धडकेत ट्रॅक्टर उलटल्याची घटना राष्ट्रीय महामार्ग ५३ वर ३० एप्रिल रोजी पहाटे ५ च्या सुमारास घडली. या अपघातात दोनजण जागीच ठार तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यापैकी दोघांना बुलढाणा येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

तालुक्यातील धरणगाव येथील काहीजण ट्रॅक्टर क्र.एम.एच. २८-ए.झेड. ३२५९ या वाहनासोबत थ्रेशर यंत्र घेऊन दसरखेड शिवारातील मका काढणीसाठी निघाले होते. उष्णतामान वाढल्याने सकाळच्या वेळी काम उरकण्यासाठी त्यांचा प्रयत्न होता. दरम्यान, ३० एप्रिल रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास नागपूर वरून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव ट्रक क्र. आर.जे. ०९- जी.बी. ५६७६ ने ट्रॅक्टर थ्रेशरला पाठीमागून जबर धडक दिली. अपघात एवढा जबरदस्त होता की ट्रॅक्टर थ्रेशर उलटले व त्यावर बसलेल्यांपैकी तीनजण थ्रेशरखाली दबले तर दोनजण बाजूला फेकल्या गेले. घटनेत बाळकृष्ण त्र्यंबक पाचपोर (५२) व रोहन किसन पाटील(२७) या दोघांच्या डोक्याला गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर मंगेश विकास पाटील(२९) व आकाश

सोनटक्के (३०) या दोघांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्याने त्यांना उपचारासाठी बुलढाणा हलविण्यात आले आहे. तर राजेंद्र सुधाकर नेरकर(३१) व पराग लितू घ्यार (४३) यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. या घटनेची माहिती मिळताच धरणगाव येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. तत्पूर्वी महामार्ग पोलिस उपनिरीक्षक संदीप इंगळे यांच्या नेतृत्वाखाली इम्रान शेख, विष्णू गलांडे, सुनील राठोड, अमोल हरामकर, विठ्ठल खाडे आदींनी दाखल होऊन मृतक व जखमींना उपजिल्हा रुग्णालयात हलविले. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी मलकापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. फिर्यादी प्रदीप नंदकिशोर पाचपोर(३५ वर्षे) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिताच्या कलम १०६(१), २८१, १२५, ३२४ सह मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार प्रशांत पाटील हे करत आहेत.

# संग्रामपूर तालुक्यात पारा ४४ अंशावर, भारनियमनामुळे संत्र्यासह केळी पीक धोक्यात

प्रतिनिधी २ मे

**संग्रामपूर :**तालुक्यात तापमानात झालेली तीव्र वाढ आणि विजेच्या भारनियमनामुळे केळी पिकाला मोठा फटका बसत आहे. बोरखेड, सगोडा, दानापूर, टुनकी, लाडनापूर परिसरातील बागायतदार शेतकरी सध्या दुहेरी संकटाचा सामना करत असून, केळीची झाडे करपत असल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणावर केळीची लागवड करण्यात आली होती. सुरुवातीला पीक जोमात वाढले; मात्र सध्या घड धरण्याच्या टप्प्यावर असताना तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने झाडांची पाने करपत आहेत आणि घड सुकण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. याशिवाय 'इमर्जन्सी लोडशेडिंग'च्या नावाखाली कृषीपंपांसाठी आठवड्यातून केवळ तीन दिवस वीजपुरवठा होत आहे.

**बागायतदार अडचणीत; आर्थिक मदतीची मागणी**

# खामगावात कामगार मंत्री चषक 2026 बुलढाणा जिल्हा निवड बुध्दिबळ स्पर्धा

प्रतिनिधी २ मे

**खामगाव :** १ मे महाराष्ट्र दिन वकामगार दिनाचे औचित्य साधून २ मे रोजी कामगार मंत्री चषक बुलढाणा जिल्हा बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा शनिवार, २ मे रोजी देशमुख मंगल कार्यालय, राम मंदिराजवळ, सिव्हिल लाईन्स, खामगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन ना. आकाशदादा फुंडकर कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य हे करणार आहेत. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिति अशोक झुनझुनवाला प्रतिष्ठ व्यापारी म्हणून हे राहणार आहेत. या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण समारंभ संध्याकाळी ५ वाजता नगराध्यक्षा सौ अपर्णाताई सागर फिंटकर यांच्या हस्ते होणार यमन या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित म्हणून सागरभाऊ फुंडकर को कॉन्व्हेनर सोसियल मिडिया सेल भाजपा महाराष्ट्र राज्य, सचिन देशमुख खामगाव जिल्हा भाजपा अध्यक्ष, यांच्या उपस्थितीत होणार आहे. या स्पर्धेला बाबुजी गोल्ड एडिबल ऑइल यांचे प्रायोजकत्व लाभले आहे व या स्पर्धेचे आयोजक बुलडाणा जिल्हा चेस सर्कल बुलडाणा व रोटरी क्लब ऑफ खामगाव यांनी केले आहे. ही स्पर्धा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेशी संलग्न असलेल्या बुलढाणा जिल्हा चेस सर्कल, बुलढाणा यांच्यातर्फे आयोजित करण्यात येत आहे. बुलढाणा जिल्हयातून महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड केली जाईल. विविध गटांतील विजेत्यांना ट्रॉफी आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धा ही ९ गटांसाठी होईल अनुक्रमे ७, ९, ११, १३, १५, १७, १९ वर्षाखालील मुले आणि मुली व खुला गट, महिला गटामध्ये घेण्यात येणार आहे. स्पर्धा सकाळी १० वाजता सुरु होईल. स्पर्धेमध्ये आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी व इतर माहितीसाठी मुख्य पंच आंतरराष्ट्रीय ऑर्बिटर दीपक चव्हाण यांच्याशी ७७९८१८३८९६ या क्रमांकावर संपर्क साधावा. ही स्पर्धा बुलडाणा जिल्हा चेस सर्कल बुलडाणा व रोटरी क्लब ऑफ खामगाव घेत आहेत. अशी माहिती स्पर्धेचे आयोजन बुलडाणा जिल्हा चेस सर्कल बुलडाणाचे अध्यक्ष सतीश राठी यांनी दिली.

# जनुना तलावात हजारो झिंगे-कोळंबी पडले मृत्युमुखी!

प्रतिनिधी २ मे

◆ विषबाधेचा संशय; मासेमारांचे लाखोंचे नुकसान, नागरिकांची गर्दी

**खामगाव :** शहरातील ऐतिहासिक जनुना तलावात गुरुवारी सकाळी अचानक हजारो झिंगे व कोळंबी मृत अवस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. तलावाच्या पाण्याच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात मृत जलचर तरंगताना दिसताच स्थानिक मासेमारांनी प्रशासनाला तत्काळ माहिती दिली. विषबाधेचा संशय व्यक्त होत असून, मासेमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तलाव परिसरात मोठी गर्दी केली. काही तासांतच मृत जलचरांचे प्रमाण वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. तलावातील पाण्याचा रंग बदलल्याचेही नागरिकांनी सांगितले. या घटनेचा सर्वाधिक फटका तलावाचे कंत्राट घेतलेल्या मासेमारांना बसला असून, त्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. नुकतेच टाकलेले कोळंबी बीजही नष्ट झाल्याने नुकसानाची तीव्रता वाढली आहे. मच्छीमार अब्दुल रऊफ यांनी नगरपरिषदेचे पाणीपुरवठा अभियंता नीरज नाफडे यांना दूरध्वनीद्वारे माहिती देत तातडीने कारवाईची मागणी केली आहे.मासेमारांचा आरोप आहे, की तलावात जाणीवपूर्वक विषारी रसायन टाकण्यात आले असावे. अत्यल्प कालावधीत मोठ्या प्रमाणात मृत्यू होणे नैसर्गिक नसल्याचे त्यांनी सांगितले असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तलाव परिसरात नियमित पाणी तपासणी, सुरक्षा व्यवस्था व देखरेख वाढवण्याची आवश्यकता नागरिकांनी व्यक्त केली आहे.तलावातील पाण्याचे नमुने तातडीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवून सखोल चौकशी करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. दोषी आढळल्यास कडक कारवाईसह प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.या घटनेमुळे झिंगे व कोळंबी पालन करणाऱ्या अनेक कुटुंबांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तलावावर अवलंबून असलेला त्यांचा उदरनिर्वाह गंभीर संकटात सापडला आहे.

**अन्य जलचरांना धोका**

◆तज्ज्ञांच्या मते, अशा घटना तलावातील संपूर्ण पर्यावरण साखळीवर परिणाम करू शकतात. जलचरांसह इतर सजीवांनाही याचा धोका निर्माण होऊ शकतो.

**जैवविविधतेवर दीर्घकालीन परिणामाची शक्यता**

◆तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या घटनांमुळे तलावातील जैवविविधतेवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होणे, रासायनिक प्रदूषण किंवा अन्य बाह्य घटकांमुळे संपूर्ण परिसंस्था धोक्यात येण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे पर्यावरण प्रेमिंमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

# सराफा बाजारात मंगळसूत्र चोरी

प्रतिनिधी २ मे

**खामगाव :** शहरातील गजबजलेल्या मेन मार्केट परिसरात पुन्हा एकदा चोरट्यांनी हात साफ केल्याची घटना समोर आली आहे. सराफा बाजारातील प्रचंड गर्दीचा फायदा घेत एका महिलेच्या पर्समधून सोन्याचे मंगळसूत्र (पोत) चोरीला गेल्याची घटना २८ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विठ्ठल मंठाजी मार्केड (३१, रा. निरोड, ता. खामगाव) हे आपल्या पत्नीसोबत लग्नासाठी खरेदी करण्याच्या उद्देशाने २८ एप्रिल रोजी खामगाव येथे आले होते. त्यांनी सराफा बाजारातील एका ज्वेलर्स दुकानातून सोन्याचे दागिने खरेदी केले आणि त्यानंतर मंगळसूत्र तयार करण्यासाठी दिले. दुपारच्या सुमारास दवाखान्यात जाऊन परत आल्यानंतर त्यांनी तयार झालेले मंगळसूत्र घेतले व घरी परतले. मात्र, घरी पोहोचल्यानंतर पर्स तपासली असता मंगळसूत्र गायब असल्याचे लक्षात आले. यामुळे गर्दीच्या ठिकाणीच अज्ञात चोरट्याने पर्स मधून ते लंपास केल्याची शक्यता व्यक्त होत आहे. चोरीस गेलेल्या मंगळसूत्रात एक पेंडंल, ६६ लहान मणी आणि २ मोठे मणी असून त्याचे एकूण वजन सुमारे ८ ग्रॅम आहे. या दागिन्यांची अंदाजित किंमत सुमारे १ लाख २८ हजार १९९ रुपये इतकी आहे.

# अवैध बायोडिझेल विक्रीला ऊत; परिसरातील नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी २ मे

**नांदुरा :** नांदुरा व मलकापूर तालुक्यांत

अवैध बायोडिझेल विक्रीचा व्यवसाय पुन्हा एकदा उघडपणे सुरू झाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. गुजरात राज्यातून रात्रीच्या अंधारात आणले जाणारे हलके ऑइल डिझेल म्हणून सर्रास विकले जात असून, शासनाच्या नियमांचा उघडपणे भंग केला जात आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे हा बेकायदेशीर धंदा बिनधास्तपणे फोफावत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

काही दिवसांपूर्वी अवैध बायोडिझेल टाकीत काम करताना दोन मजुरांचा मृत्यू झाल्यानंतरही प्रशासनाने धडा घेतलेला दिसत नाही. त्या घटनेनंतर काही काळ कारवाईचा दिखावा झाला; मात्र सध्या पुन्हा नांदुरा तालुक्यातील नायगाव परिसरात गुरुद्वारासारख्या धार्मिक स्थळाजवळच अवैध पेट्रोल पंप सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकाराकडे तहसील कार्यालय, पुरवठा विभाग, पोलिस प्रशासन तसेच स्थानिक गुन्हे शाखेकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या बेकायदेशीर धंद्यांमुळे शासनाचा महसूल बुडत असून नागरिकांच्या जीवितालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. तरीही संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याने संताप व्यक्त होत आहे. यापूर्वीही केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाले आहे.

# खामगाव बाजार समितीतून ४१ हजारांचा शेतमाल लंपास

प्रतिनिधी २ मे

**खामगाव :** शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात २४ ते २५ एप्रिल दरम्यान रात्री ३ वाजण्याच्या सुमारास धान्य चोरीची घटना घडली असून, तीन महिलांनी ही चोरी केल्याचे सीसीटीव्ही फुटेज मधून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात बुधवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला असून, अद्याप कोणताही मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला नाही.तक्रारीनुसार, तिन्ही अज्ञात महिलां विरोधात खामगाव शहर पोलिस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)व ३(५)नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी भागवत मधुकर बोराडे (४५, रा. पोरज, ता. खामगाव) यांनी फिर्याद दिली असून ते बाजार समितीत सुरक्षा पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. २४ ते २५ एप्रिल दरम्यान रात्री ३ वाजण्याच्या सुमारास अडते सुयोग प्रमोद झंवर व अतुल धनुका यांच्या दुकानातून चोरी झाली.

अज्ञात महिलांनी अंदाजे ५ क्विंटल सोयाबीन(सुमारे २० हजार रुपये)आणि ३ क्विंटल तूर (सुमारे २१ हजार रुपये) असा एकूण ४१ हजार रुपयांचा धान्यसाठा लंपास केला. घटनेनंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, २५ एप्रिल रोजी पहाटे ३.०० ते ३.३० वाजताच्या दरम्यान तीन महिलांनी संबंधित दुकानातून धान्य नेत असल्याचे दिसून आले. त्यामुळे चोरीचा प्रकार उघडकीस आला. पुढील तपास पोहेकों रामेश्वर फासे करीत आहेत. दरम्यान, तूर चोरी प्रकरणी कृउबासमधील अडत्यांनी सभापती आणि सचिवांची भेट घेऊन नाराजी व्यक्त केली होती.

# बालकांशी संबंधित गुन्हे वाढले ; जिल्ह्यात बाल पोलिस पथक कक्ष

◆ वाढत्या गुन्हेगारीकडे वळणाऱ्या बालकांचे मनपरिवर्तन करण्यासाठी प्रशासनाचे पाऊल!

प्रतिनिधी २ मे

**खामगाव :** मुलांच्या हक्कांचे प्रभावी संरक्षण, त्वरित प्रतिसाद आणि संवेदनशील हाताळणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने एक महत्त्वपूर्ण व दूर दृष्टीपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील प्रत्येक पोलिस अधीक्षक कार्यालय तसेच शहरी भागातील पोलिस आयुक्तालयांत 'विशेष बाल पोलिस पथक कक्ष' स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे बालकांशी संबंधित प्रकरणांची अधिक काटेकोर, जलद आणि संवेदनशील पद्धतीने हाताळणी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यभरात अल्पवयीन मुला-मुलींवरील अत्याचार, शोषण, हरविण्याच्या घटना तसेच सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण ही गंभीर बाब बनली आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक संवेदनशील झाला असून, कायदा व सुव्यवस्था यंत्रणेसमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.: पोलिस अधीक्षक किंवा पोलिस आयुक्त स्तरावरील अधिकारी. नोडल ऑफिसर : पोलिस उपअधीक्षक अधिकारी या कक्षाचा मंडळ अधिकारी असेल. किंवा सहायक पोलिस आयुक्त दर्जाचा सहभागी : दोन अनुभवी पोलिस निरीक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि बाल हक्क क्षेत्रातील तज्ज्ञ विशेष बाल पोलिस पथक कक्ष स्थापन करण्याचा आदेश! बाल न्याय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात हा कक्ष असणे अनिवार्य आहे. बालकांशी निगडित गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांचा दृष्टिकोन हा केवळ दंडात्मक नसावा, तर तो सुधारणावादी असावा, असा आदेश राज्य बाल हक्क आयोगाने दिला आहेत.

# पिकविमा तात्काळ देण्यासाठी कृषिमंत्र्यांना साकडे

प्रतिनिधी २ मे

◆ शेतकरी योद्धा कृती समितीचा आंदोलनाचा इशारा

**सिंदखेडराजा :** जिल्ह्यातील आणि विशेषतः बुलढाणा जिल्ह्यातील प्रलंबित पिक विम्याच्या प्रश्नावरून शेतकरी योद्धा कृती समितीने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'शेतकऱ्यांचा हक्काचा पिक विमा २० मे पर्यंत मंजूर न झाल्यास आंदोलन करण्यात येईल,' असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे. ३० एप्रिल रोजी वाशीम येथे जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांची शेतकरी योद्धा कृती समितीच्या प्रतिनिधींनी भेट घेतली. यावेळी प्रलंबित पिक विमा आणि बागायती मदतीसंदर्भात सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले.

कृषिमंत्री यांना निवेदन देताना शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक बालाजी सोसे यांच्यासह प्रविण गिते, किसनराव आटोळे, शिद्धेश्वर आंधळे, शिवानंद सांगळे, आकाश खरात आदी प्रतिनिधी उपस्थित होते. प्रतिनिधींनी प्रामुख्याने सिंदखेडराजा देऊळगाव राजा व लोणार तालुक्यातील सन २०२५ च्या खरीप हंगामातील पिकविमा तात्काळ वितरित करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळणारी बागायती मदत तातडीने मंजूर करावी आदी मागण्या केल्या.

कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांची बाजू सविस्तर ऐकून घेतली. यावेळी त्यांनी कोणतेही ठोस लेखी आश्वासन दिले नसले तरी, प्राप्त निवेदन संबंधित कृषी विभाग (बुलढाणा) येथे तात्काळ पाठवून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांचे लक्ष

निर्णयाकडे सध्या पिक विमा कंपनी आणि कृषी विभागाच्या भूमिकेकडे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यासह सिंदखेडराजा, देऊळगाव राजा व लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. आपल्या हक्कासाठी न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा निर्धार कृती समितीने व्यक्त केला आहे

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# मोर्णा नदीवर जलयुक्त शिवार बंधाऱ्याचे भूमिपूजन ; शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन सिंचनाखाली येणार

प्रतिनिधी २ मे

**अकोला :** महाराष्ट्र दिन, बुद्ध जयंती व कामगार दिनाचे औचित्य साधून जलसंधारण विभागाच्या वतीने अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी मोर्णा नदीवर 'जलयुक्त शिवार' बंधाऱ्याचे भूमिपूजन झाले.

जिल्ह्याचे पालकमंत्री ?ड. आकाश फुंडकर, आमदार रणधीर सावरकर आणि शेतकरी, खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते हा सोहळा झाला.



याप्रसंगी अंबादास उमाळे, दक्षिण मंडळ अध्यक्ष संजय कोरडे, रवी गावंडे, गणेश अंधारे, वैकुंठ ढोरे, राजू ठाकरे, विठ्ठल चतरकर, कडू साहेब, विजय डाबेराव, देविदास बोदडे, वासुदेव रोकडे, करण ठाकूर, वैभव माहोरे, प्रवीण कोकाटे, गणेश वाणरे, मनोर रोकडे, शाम शेळके, निलेश मालोकार, अंकुश इंगळे, नारायण बोर्डे, हर्षल गोंडचवर, अण्णासाहेब इंगळे, गणेश इंगळे, साहेबराव इंगळे, रमेश इंगळे, निळकंठ इंगळे, सुरेश इंगोले, गोपाल इंगळे, आनंद इंगळे, जनार्दन इंगळे, केशव इंगळे, मनोहर सातारकर, दिलीप इंगळे, गजानन काळे, ज्ञानेश्वर इंगळे, शंकर इंगळे, शंकर तांबे आदी पदाधिकारी, ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. आकाश फुंडकर म्हणाले, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जलयुक्त शिवार योजनेतून मोरणा नदीचे खोलीकरण, रुंदीकरण व सिमेंट बंधाऱ्यांमुळे भूजल पातळी २ ते ३ मीटरने वाढेल. चांगेफळसह १० गावांतील शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन बारमाही सिंचनाखाली येईल.' आमदार रणधीर सावरकर म्हणाले, 'अकोला पूर्वच्या प्रत्येक शेतापर्यंत पाणी पोहोचवणे हा माझा संकल्प आहे. गॅबियन बंधारे, सलग समतल चर व रिचार्ज शाफ्टमुळे खरीप-रब्बी दोन्ही हंगाम हमखास होतील. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे.' खासदार अनुप धोत्रे म्हणाले, 'बुद्ध जयंतीच्या शांततेचा व कामगार दिनाच्या श्रमसन्मानाचा संदेश घेऊन शेतकरी, ग्रामीण मातृशक्ती व युवकांच्या कल्याणासाठी केंद्र-राज्य सरकार एकत्र काम करत आहे. या बंधाऱ्यामुळे पिण्याचे पाणी व जनावरांसाठीही पाणी उपलब्ध होईल.'

# राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमाला प्रारंभ ; स्वगणनेचा पहिला टप्पा सुरू

प्रतिनिधी २ मे

**अकोला :** जनगणना हे राष्ट्रीय कार्य आहे. नागरिकांनी दिलेल्या अचूक माहितीवर पुढील १० वर्षांसाठी जिल्ह्याच्या शाळा, दवाखाने, रस्ते, पाणीपुरवठा योजना, रेशन व्यवस्था व इतर विकासकामांचे नियोजन अवलंबून आहे. त्यामुळे नागरिकांना स्वगणना करून अचूक माहिती द्यावी, तसेच प्रगणकांनाही सहकार्य करावे, असे आवाहन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी येथे केले.

राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय शुभारंभ व कार्यक्रमाच्या अनुषंगाने पत्रकार परिषद पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्र. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे आदी यावेळी उपस्थित होते.

♦ पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय शुभारंभ




राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमात स्वगणनेचा टप्पा आजपासून १५ मेपर्यंत चालेल. त्यानंतर प्रगणकांमार्फत दिनांक १६ मे ते १४ जुन २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन माहिती संकलन केली जाणार आहे. ही प्रक्रिया अत्यंत सुलभ व डिजीटल करण्यात आली आहे. नागरिक स्वतः मोबाईलद्वारे माहिती भरू शकतात. जनगणना कायदा १९४८ नुसार नागरिकाची वैयक्तिक माहिती १०० टक्के गोपनीय राहील. ती कोणत्याही न्यायालयीन किंवा महसुली कामासाठी वापरली जात नाही. त्यामुळे प्रत्येकाने ही प्रक्रिया पूर्ण करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करावे, असे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले. अकोला जिल्ह्याने नेहमीच शासकीय उपक्रमात पुढाकार घेतला आहे. डिजिटल जनगणनेतही आपला जिल्हा महाराष्ट्रात अव्वल राहील, असा मला विश्वास आहे. 'आपली नोंद, आपला विकास' हे ब्रीद लक्षात ठेवून सर्व नागरिकांनी स्व-गणना करावी व प्रगणकांना सहकार्य करावे. जनजागृतीसाठी माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असून, या कार्यासाठी माध्यमांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रभारी जिल्हाधिकारी स्वामी यांनी जनगणना कार्यक्रमाचे टप्पे, मनुष्यबळ आदी माहिती दिली. महापालिका आयुक्त लहाने यांनीही शहरातील कार्यक्रम, मनुष्यबळ आदी माहिती दिली. मालठाणे यांनी आभार मानले.

# 'अग्रवाल कोचिंग क्लासेस' च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

माहेश्वरी भवनात सोहळ्याला पालकांचीही उपस्थिती

प्रतिनिधी २ मे

**अकोला :** स्थानिक माहेश्वरी भवन येथे आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात 'अग्रवाल कोचिंग क्लासेस'च्या १० वी मधील यशस्वी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावर्षी सीबीएसई दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून संस्थेचे नाव उज्ज्वल करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कौतुकासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे संचालक संकेत अग्रवाल सर, रेणुका अग्रवाल मॅम आणि कविता अग्रवाल मॅम यांची प्रमुख उपस्थिती होती. या मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांची कठोर मेहनत आणि




शिक्षकांचे समर्पण हेच या यशाचे खरे गमक आहे.' याप्रसंगी अश्विन बारे सर आणि पवन पाटील सर यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दहावीचा टप्पा पार पाडल्यानंतर पुढील वाटचालीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे सल्ले दिले. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या पालकांनी आणि अतिथींनी अग्रवाल कोचिंग क्लासेसच्या शैक्षणिक दर्जाचे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या परिश्रमांचे कौतुक केले. गुणानुक्रमे अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते 'ट्रॉफी' आणि 'प्रशस्तीपत्र' देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मान स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यशाचा आनंद आणि आत्मविश्वास ओसंडून वाहत होता. आपल्या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना आणि अग्रवाल क्लासेसच्या मार्गदर्शकांना दिले. समारंभाला विद्यार्थी, पालक आणि शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पावसाळ्यापूर्वी १४४ मोठ्या नाल्यांची सफाई करा : गिरीश जोशी

प्रतिनिधी २ मे

**अकोला :** पावसाळा सुरू होण्यास केवळ एक महिना शिल्लक असल्याने अकोला शहरातील १४४ मोठ्या नाल्यांची साफसफाई युद्धपातळीवर सुरू करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक व भाजप प्रसिद्धीप्रमुख गिरीश कुमार जोशी यांनी केली आहे. जोशी म्हणाले, 'मनपा आयुक्त, महापौर व सभापती यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सफाई मोहिमेला गती द्यावी. राज्यात इतरत्र नाले सफाई अभियान सुरू झाले असून अकोल्यात मात्र अद्याप कामाला वेग आलेला नाही. मोठी उमरी, गीता नगर, शिवसेना वसाहत, डाबकी रोड, रणपिसे नगर, अकोट फाईल, न्यू तापडिया नगर, खरप परिसर, दुर्गा चौक, खडकी या भागांमध्ये पावसाळ्यात घरांमध्ये व रस्त्यावर पाणी साचते. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो.

# एस. एस. खरोटे सुवर्णकार शोरूममध्ये सुरू असलेल्या आकर्षक योजनांना ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २ मे

**अकोला :** अकोला शहरातील गांधी चौक स्थित एस. एस. खरोटे सुवर्णकार प्रा. लि. शोरूममध्ये सुरू असलेल्या आकर्षक योजनांना ग्राहकांकडून मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गुरूपुष्यामृत योग दरम्यान या शोरूममध्ये



ग्राहकांची विशेष गर्दी पहावयास मिळाली . येथे सोने, चांदी, हिरे, प्लॅटिनमचे आभूषण व दागिन्यांच्या खरेदीसाठी ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण पहावयास मिळत आहे.

तीन मजली भव्य शोरूममध्ये ग्राहकांसाठी विविध आकर्षक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांवर



केवळ १ टक्क्यांपासून मेकिंग चार्ज, तसेच जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना शून्य टक्के घट (नियम व अटी लागू) यांसारख्या योजनांना ग्राहकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे शहरातील ग्राहकांचा कल या शोरूमकडे अधिकाधिक वाढताना दिसत आहे. विशेष ग्राहकांसाठी आवडणारी नवीन आणि आकर्षक दागिन्यांची भव्य श्रृंखला या शोरुममध्ये सादर करण्यात आली आहे. शोरूमचे संचालक शैलेश खरोटे आणि सुनील खरोटे यांनी सांगितले की, अनेक दशकांपासून ज्वेलरी क्षेत्रात विश्वासार्ह सेवा देत असलेल्या त्यांच्या संस्थेला ग्राहकांचा वाढता प्रतिसाद हीच सर्वात मोठी पावती आहे. शोरूममध्ये पारंपरिक ते आधुनिक अशा विविध डिझाइन्समध्ये मंगळसूत्र, टेम्पल ज्वेलरी, डायमंड ज्वेलरी, रोज गोल्ड, प्लॅटिनम तसेच नव नवीन ट्रेंडनुसार तयार केलेले आकर्षक दागिने उपलब्ध आहेत. ग्राहकांनी या सुवर्णसंधीचा लाभ अवश्य घ्यावा व आपल्या आवडीचे व मनपसंद दागिने खरेदी करून आनंद द्विगुणित करावा असे आवाहन शोरूमच्या संचालकांनी केले आहे.

# बसस्थानक परिसर बनला अवैध पार्किंग स्थळ



प्रतिनिधी २ मे

**अकोला :** बसस्थानक परिसराला अवैध पार्किंग स्थळाचे रूप आले आहे. वाहतूक शाखा पोलिस याकडे दुर्लक्ष का करतात असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वाहनांची रांग लागलेली दिसते. त्यांना बंधने घातली जात नाही त्यामुळे त्यांची हिंमत वाढत आहे. गैरप्रकार तातडीने थांबणे आवश्यक आहे.

हा परिसर मोकळा असावा कारण बसेसची ये जा सुरू असते. तसेच ऑटोरिक्षा, दुचाकी, चारचाकी वाहने सतत धावत असतात. आणि दुसरीकडे उड्डाणपुलाच्या खाली वाहने बिनधास्त उभी राहतात. जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थाना समोर वाहने उभी राहतात. त्यांना कसलाही धरबंद दिसत नाही. याकडे दुर्लक्ष करून उपयोग नाही. कारण थोडी चूक झाली तरी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतींचा राजीनामा ; कार्यभार उपसभापतींकडे

वि प्रतिनिधी २ मे

**अकोट :** अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत पाचडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. त्यांनी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा देत जिल्हा उपनिबंधक कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर केला. संबंधित कार्यालयाने त्यांचा राजीनामा स्वीकारला असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, पाचडे यांच्या राजीनाम्यानंतर समितीचे कामकाज सुरळीत सुरू राहावे यासा ी पुढील सभापती निवड होईपर्यंत कार्यभार उपसभापतींकडे सोपविण्यात आला आहे. दैनंदिन प्रशासनात कोणताही अडथळा येऊ नये, यासा ी ही व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पदभार हस्तांतरण प्रक्रियेबाबतचा सविस्तर अहवाल बाजार समितीच्या सचिवांकडून मागविण्यात आला असून, प्रशासनिक कामकाजावर बारकाईने लक्ष 'वले जात आहे. या संक्रमण काळात कोणतेही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हा उपनिबंधकांनी दिले आहेत. त्यामुळे बाजार समितीतील पुढील घडामोडींविषयी उत्सुकता वाढली असून, नव्या सभापतीच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बार्शीटाकळीत महाराष्ट्र दिन उत्साहात ; नगराध्यक्षांची होती उपस्थिती

प्रतिनिधी २ मे

**बार्शीटाकळी :** महाराष्ट्र राज्य स्थापना दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून बार्शीटाकळी शहरात विविध ठिकाणी ध्वजारोहणाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. स्थानिक तहसील कार्यालयात अकोल्याचे आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी 'वंदे मातरम' आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीतांच्या निनादाने संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता.

तहसील कार्यालयातील कामकाजात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते कार्यक्षम तलाठी व कर्मचाऱ्यांना लॅपटॉपचे वाटप करण्यात आले. यामध्ये निखिता

♦ आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण व लॅपटॉप वाटप



काळे, राहुल चव्हाण आणि राहुल ठोसरे यांचा समावेश आहे. 'डिजिटल इंडिया ही काळाची गरज असून, या तंत्रज्ञानामुळे नागरिकांना वेळेत सेवा मिळण्यास मदत होईल,' असे प्रतिपादन आमदार सावरकर यांनी यावेळी केले.नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष अख्तर खातून अलिमुद्दीन यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. तहसील कार्यालयात सकाळी ८वाजता मुख्य शासकीय समारंभ पार पडला. या सोहळ्याला तहसीलदार रवींद्र कापसीकर, नगराध्यक्ष अख्तर खातून अलिमुद्दीन, ठाणेदार धुमाळे, नायब तहसीलदार अतुल सोनवणे, अक्षय नागे, विनोद पाचपोहे, नितीन मात्रे, आनंद गुप्ता यांच्यासह गोपाल महल्ले, संकेत राठोड, गजानन लुले, अनंत केदारे, सौरभ अग्रवाल, लखन गावंडे, रमेश वाटमारे, गणेश महल्ले, शंकर वरघट आणि दत्तात्रय साबळे यांसारखे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण तालुक्यातील ध्वजारोहणाचे कार्यक्रम अत्यंत शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

सर्व वाशिमकरांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

प्रवेश ! प्रवेश ! मोफत प्रवेश !

प्रगतीच्या वाटेवरील सुविधायुक्त
नगर परिषद वाशिम
अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक (मराठी व उर्दू माध्यम)
शाळामध्ये सन 2026-27 करिता मोफत प्रवेश

आम्ही गुणवत्ता पाहून मुलांना प्रवेश देत नाही तर प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता निर्माण करतो.



- आपली हक्काची नगर परिषद शाळा
- सुविधायुक्त आकर्षक इमारत
- प्रवेश फी नाही- सर्व शिक्षण मोफत
- मराठी व उर्दु माध्यमाची सोय.
- Digital Classroom, Computer Education, E-learning
- दर्जेदार,गुणवत्तापूर्ण शिक्षण.

- Activity based Education, विविध सामाजिक उपक्रम
- स्नेह संमेलन
- विद्यार्थ्यांना मोफत भौतिक सुविधा व वर्षभर लागणारे शालेय साहित्याचे मोफत वाटप
- मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेमध्ये तालुक्यातून प्रथम पुरस्कार प्राप्त शाळा.






- प्रशिक्षित अनुभवी शिक्षक वृंद.
- मोफत शालेय पोषण आहार वर्ग 1 ते 8
- विविध शासकीय योजनांचा लाभ.
- नवोदय स्कॉलरशिप व स्पर्धा परीक्षा विशेष तयारी.
- पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

- आनंददायी शिक्षण
- आदर्श विद्यार्थी, आदर्श शिक्षक, आदर्श पालक यांना पुरस्कार.
- मोफत शालेय गणवेश वाटप
- शालेय परिसर CCTV निगराणीत
- विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन.



एकच ध्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास

अनिल केंदळे (नगराध्यक्ष) नगर परिषद वाशिम
राजु भांदुर्गे (उपाध्यक्ष) नगर परिषद वाशिम
कुणाल हेडा (शिक्षण सभापती) नगर परिषद वाशिम
निलेश गायकवाड (मुख्याधिकारी) नगर परिषद वाशिम

सभापती, उपसभापती, सदस्य गण, प्रशासन अधिकारी (शिक्षण) मुख्याध्यापक, शिक्षक वृंद नगर परिषद वाशिम.

तर चला मग आपल्या मुलांच्या स्वप्नपूर्ती व उज्ज्वल भविष्याकरिता आजच आपला प्रवेश निश्चीत करु या.

Rays 9850356078

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK